02 TO 08 FEBRUARY 2026 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 1/31/2026 8:38 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता वारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १४ | अंक : ३ | सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६ ते रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड

## दोघांच्या भांडणात मध्यस्थी करुन फसला निरपराध दिलशाद जीव गमावून बसला

भिवंडी : क्राईम रिपोर्टर

आजकाल कुणाच्या भांडणात मध्यस्थी करू नये. कारण भांडण करणारे बाजूलाच राहतात आणि जो मध्यस्थी करणारा असतो त्याला जीव गमवावा लागतो. अशा घटना अनेक ठिकाणी घडलेल्या आहेत. खास करून नातेवाईकांमध्ये अशा जास्त घटना घडतात. भिवंडीच्या शांतीनगर मध्ये अशाच एका घटनेत पती पत्नीच्या भांडणात पत्नीच्या मावस भावाने मध्यस्ती केल्याचा पतीच्या भावना इतका राग आला कि त्यांनी मध्यस्थी करणाऱ्या वहिनीच्या मावस ...पान २ वर

## व्यसनी पतीवरील भयंकर राग तिच्यासाठी काळ ठरला मुलीला जखमी करून आईनेच मुलाचा गळा चिरला





पुणे : क्राईम रिपोर्टर

आई या दोन अक्षरी शब्दांमध्ये संपूर्ण भाव विश्व सामावलेले आहे. माणसाची पहिली ओळख त्याच्या आईपासून होते. कारण आईनेच त्याला जन्म दिलेला असतो. हे जग दाखवलेले असते. त्यामुळे प्रत्येक माणसाच्या नजरेत आईची प्रतिमा एखाद्या देवी इतकीच असते. आईचे प्रेम आईचे वात्सल्य आईची माया यापुढे जगातील सर्व काही फिके असते. भारतीय संस्कृतीत आईला साक्षात देवतेचे स्थान आहे. त्यामुळेच माणूस तिची पूजा करतो. अशा या पूज्यनीय देवतेवर जेंव्हा तिनेच जन्माला घातलेल्या बाळाचा जीव घेण्याची पाळी येते तेंव्हा तिची काय अवस्था होत असेल याची कल्पनाही करवत नाही. आईला नेहमीच आपल्या मुलांच्या भविष्याची काळजी असते. पण जेंव्हा त्या मुलांच्या भविष्यावर येणाऱ्या संकटाची तिला चाहूल लागते आणि ते संकट आपल्या हातून दूर होऊ शकत नाही याची जेंव्हा तिला जाणीव होते तेंव्हा एकतर ती स्वतःच स्वतःला संपवते किंवा आपल्या मागे आपल्या मुलांचे हाल नको म्हणून स्वतःच त्या मुलांचा घात करते. पुण्याच्या वाघोलीत अशीच एक हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली आहे. पती व्यसनी असल्याने काम धंदा नीट करीत नसल्याने संसार उध्वस्त होण्याच्या मार्गावर होता, अशावेळी कोणताही मार्ग समोर दिसत नसल्याने एका विवाहितेने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला होता. पण आपल्या आत्महत्येनंतर आपल्या दोन मुलांचे काय त्यापेक्षा त्यांना मारून आत्महत्या करावी असा विचार करून तिने दोन्ही मुलांवर हल्ला केला त्यात एक मुलगा जागीच तर मुलगी गंभीर जखमी झाली या प्रकरणी आरोपी आईला पोलिसांनी अटक केली आहे. मात्र या घटनेने संपूर्ण पुणे हादरून गेलेय.

पुण्यातील वाघोली येथे एका मातेने आपल्याच दोन मुलांवर जीवघेणा हल्ला केला. या घटनेत ११ वर्षाच्या मुलाचा मृत्यू झाला असून, १३ वर्षाची मुलगी गंभीर जखमी झाली आहे. आरोपी आई सोनी संतोष जायभायला अटक करण्यात आली असून, हल्ल्याचे कारण अस्पष्ट आहे. या हृदयद्रावक घटनेने पुणे हादरले असून, परिसरातील नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. पुण्यातील वाघोली परिसरातील बाईफ रोडवर एका महिलेने तिच्या दोन मुलांवर हल्ला केला. ११ वर्षाच्या मुलाचा यात मृत्यू झाला तर १३ वर्षाची तिची मुलगी गंभीर जखमी झाली असून रुग्णालयात जीवन-मृत्यूच्या उंबरठ्यावर असून जगण्यासाठी झुंज देत आहे. सोनी संतोष जायभाय असे हल्लेखोर महिलेचे, त्या आईचं नाव असून पोलिसांनी तिला अटक करून तिच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे सुसंस्कृत, सुशिक्षितांचं शहर म्हणून नावलौकिक असलेलं पुणं प्रचंड हादरलं असून परिसरातील नागरिकही दहशतीत आहेत. आरोपी मिहाल सोनी संतोष जायभाय ही मूळची पुण्याची नाही. ती नांदेडच्या कंधार येथील रहिवासी असून काही काळापासून पुण्यातल्या बाईफ रोडवरच्या एका इमारतीत तिच्या कुटुंबासह राहते. या घटनेत तिचा ...पान २ वर

## पैंशांसमोर दोस्ती यारी कुठली उधारी वरून आयुष्याची दोरी तुटली

जळगाव : क्राईम रिपोर्टर



मैत्रीत कधीही पैशाचे व्यवहार करायचे नसतात आणि केले तरी लवकरात लवकर ते मिटवायचे असतात. कारण पैशांवरून जिथे रक्ताची नाती तुटतात तिथे मैत्रीचे काय. आकाश आणि बाळू या दोन मित्रांमध्ये असेच झाले. बाळूने आजारपणात आकाशकडून ३० हजार रुपये उसने घेतले होते, पण तो पैसे परत करीत नव्हता. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला. मैत्री तुटली आणि एके दिवशी आकाशने बाळूची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी आकाशला अटक केली आहे.









जळगाव तालुका पोलिस स्टेशन हद्दीत भोलाणे हे गाव आहे. या गावात आकाश रामकृष्ण कोळी हा तरुण रहात होता. याच गावात बाळू सदाशिव कोळी हा तरुण देखील रहात होता. आकाश कोळी यास आकाश टेलर या नावाने गावातील सर्वजण ओळखत होते. आकाश कोळी आणि बाळू कोळी हे दोघे एकमेकांचे मित्र होते. एके दिवशी बाळू यास वैद्यकीय उपचारासाठी तिस हजार रुपयांची गरज होती. त्यामुळे बाळूने त्याचा मित्र आकाशकडे उधार स्वरुपात पैशांची मागणी केली. बाळूची वैद्यकीय निकड लक्षात घेत आकाशने त्याला तिस हजार रुपये उधार दिले. त्यामुळे बाळूची गरज आणि वेळ भागली. आकाशला त्याची रक्कम वेळेवर परत करणे बाळूला क्रमप्राप्त होते. मात्र तसे झाले नाही. दिवसामागून दिवस जात होते. बाळूने आकाशला त्याची तिस हजार रुपयांची रक्कम वेळेवर परत केली नाही. त्यामुळे आकाश त्याने उधार दिलेल्या तिस हजार रुपयांच्या मागणीसाठी बाळूकडे तगादा लावत होता. बाळू नाही म्हणत नव्हता आणि ती रक्कम आकाशला परत देखील करत नव्हता. त्यामुळे चालढकल करणा-या बाळूवर आकाश चिडून होता. तो बाळूला सातत्याने त्याच्या रकमेसाठी फोन करत असे. मात्र चालढकल करण्याचे बाळूचे काम सुरुच होते. त्यामुळे दोघा मित्रांमधे वादाची ठिणगी पडण्यास सुरुवात झाली. दोघातील वाद इतर नातेवाईक आणि मित्रांच्या हस्तक्षेप आणि सामंजस्याने मिटवण्यात आला होता. त्यानंतर दिवसामागून दिवस निघून गेले आणि वर्ष देखील उलटून गेले. १४ जानेवारी हा मकर संक्रांतीचा दिवस उजाडला. या दिवशी सर्वत्र तिळगुळ घ्या आणि गोडगोड ...पान २ वर

## उसाचे वाढे नेण्यास विरोध केला निरपराध विनायकचा जीव गेला

कडेगाव : क्राईम रिपोर्टर



ग्रामीण भागात सध्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी उस तोडणी झाल्यावर उसाचे जे वाढे असतात ते आपल्या जनावरांसाठी चार म्हणून वापरतात. कडेगाव तालुक्यातील धनेवादी येथील विनायक ढाणे याच्या चुलत्याची उस तोडणी सुरु असतानाच दुसऱ्या गावातून आलेल्या हनुमंत सूर्यवंशी आणि त्याच्या मुलांनी उसाचे वाढे गोळा करायला सुरुवात केली. विनायक ढाणे याने पुढे होऊन त्याला विरोध केला. त्यामुळे चिडलेल्या सूर्यवंशी व त्याच्या मुलांनी विनायक याला बेदम मारहाण केली. तसेच त्याच्या बचावासाठी आलेल्या त्याच्या नातेवाईकांना सुद्धा मारहाण केली. सूर्यवंशीच्या मारहाणीत विनायकचा मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबातील लोक जखमी झाले. या प्रकरणी पोलिसांनी हनुमंत सूर्यवंशी व त्याच्या मुलांना अटक केली आहे.

पश्चिम महाराष्ट्र हा ऊसाच्या शेतीसाठी प्रसिध्द आहे. दिवाळी नंतर या भागात बहुतांश साखर कारखाने चालू होत असल्याने शेतातील ऊस तोडी ही चालू होत असतात. बरेच ...पान २ वर

## दारू सोड म्हणताच संतापाने पेटला उपसरपंचाने पत्नीचा जीवच घेतला

नाशिक : क्राईम रिपोर्टर




कोणत्याही लोकप्रतिनिधीने जनमानसात आपली प्रतिमा चांगली ठेवायची असते. तरच लोक त्याला मन सन्मान देतात. पण काही लोकप्रतिनिधी व्यसनी असतात अशा लोकांच्या हातून कडी कधी खुनासारखा गंभीर गुन्हाही घडू शकतो. नाशिक जिल्ह्याच्या साखरेपाडा गावात एका दारुड्या उपसरपंचाने दारूच्या नशेत आपल्या पत्नीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी उपसरपंचाला अटक केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुक्यात असलेल्या साखरे पाडा येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. दारूच्या नशेत असलेल्या पतीने आपल्या पत्नीची धार धार शस्त्राने वार करत निर्घुण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे हत्या करणारा हा गावचा उपसरपंच असल्याचे समोर आले आहे. पत्नीची हत्या केल्यानंतर उपसरपंचाकडून स्वतः देखील विष प्राशन करून आपल्या आयुष्याची अखेर करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या थरारक घटनेमुळे साकोरे पाडा गावावर शोककाळ पसरली असून व्यसनाधिनतेचा भयंकर चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे. जयराम महारु पवार असे आरोपी उपसरपंचाच नाव असल्याचं समोर आलं आहे. साकोरे पाडा येथील रहिवासी आणि उपसरपंच जयराम महाहरू पवार (वय ६५) यांना दारूचे प्रचंड व्यसन होते. त्यांच्या या व्यसनामुळे घरात येणे पती-पत्नी यांच्यात वाद होत होते. त्यांच्या पत्नी जिजाबाई जयराम पवार (वय ६०) या त्यांना दारू सोडवण्यासाठी नेहमी टोकत असत. त्यामुळे दोघा पती-पत्नीमध्ये नेहमी भांडण होत होते. मध्यरात्रीच्या सुमाराचे राम पवार हे दारूच्या नशेत घरी आले ...पान २ वर

## रक्ताच्या नात्यात सूडाचा वणवा पेटला जन्मदात्या बापाचा मुलाने जीव घेतला

नाशिक : क्राईम रिपोर्टर



आजकाल नाती गोती शिल्लक राहिलेली नाही. एकाच कुटुंबात रक्ताच्या नात्यातील माणसेही एकमेकांच्या जीवावर उठतात. त्यामुळे बाप लेकाचा आणि भाऊ भावाचा वैरी बनून एकमेकांच्या जीवावर उठतो. नाशिक जिल्ह्याच्या जातेगावामध्ये राहणारा विठ्ठल गायकवाड याला दारूचे व्यसन होते. तो दारू पिऊन कुटुंबातील लोकांना त्रास द्यायचा. त्यामुळे विठ्ठलचा मुलगा कृष्णाला बापाचे हे वागणे आवडत नव्हते. त्यातून बाप लेकांमध्ये अनेक वेळा वाद झाले. हे वाद इतके वाढले कि बाप लेक एकमेकांच्या जीवावर उठले, त्यातून बापाने एके दिवशी मुलाला विजेचा शोक देऊन मारण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्यातून कृष्ण वाचला, पण आता बापाकडून आपल्या जीवाला धोका आहे. त्यामुळे बापाला कायमचे संपवायचे असा विचार करून एके रात्री त्याने बापाचीच हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे.

नाशिक जिल्ह्यात घडलेल्या घटनेत बापच मुलाच्या जीवावर उठला होता. मुलगा मरावा यासाठी बाप कारस्थान ...पान २ वर

## प्रेम विवाहामुळे संसाराचे स्वप्न फसले सैराटलेल्या भावाने बहिणीचे कुंकू पुसले



सोलापूर : क्राईम रिपोर्टर

जातीपातीच्या बुरसटलेल्या मानसिकतेतून अजूनही लोक बाहेर पडायला तयार नाहीत आणि त्यातूनच ऑनर किलिंगचे प्रकार घडत आहेत. समान आडनाव असल्याने गोत्र एकाच असू शकते. असे असताना बहिणीने प्रेमविवाह केला. त्यामुळे एक भाऊ इतका चिडला कि त्याने फसवून बहिणीला व तिच्या पतीला जेवायला बोलावले आणि भावोजीची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

प्रेमसंबंधातून झालेल्या बहिणीच्या लग्नाचा राग मनात धरून बहिणीला व तिच्या पतीला पांगरी (ता. बार्शी) गावाजवळील हॉटेलमध्ये जेवायला बोलावले. तेथे दारू पिताना झालेल्या बाचाबाचीतून दारूची काचेची बाटली फोडून बहिणीच्या पतीवर गळ्यावर वार करून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी २८ जानेवारी रात्री आठच्या सुमारास घडली. सैराटप्रमाणेच ऑनर किलिंगचा हा प्रकार असल्याचं मानलं जात आहे. ...पान २ वर

## कर्जवसुलीसाठी दांडगाई करुन चुकले दोन सावकार भाऊ जीवाला मुकले



कारवार (कर्नाटक) : क्राईम रिपोर्टर

सावकारी विरुद्ध कायदा असतानाही सावकारीचा धंदा थांबलेला नाही. पण सावकार जेंव्हा कर्ज वसुलीसाठी दांडगाई करू लागतात आणि कर्ज घेणाऱ्याच्या मागे वसुलीसाठी तगादा लावतात. तेंव्हा मात्र अगोदरच वैतागलेला कर्जबाजारी माणूस कुठल्याही थराला जावून काहीही करतो. कर्नाटकातील कुडगुंडा गावात चंद्रशेखर हसलर नावाच्या सावकाराने त्याचाच मित्र असलेल्या प्रमोद नायक नावाच्या इसमाला कर्ज दिले होते. मात्र प्रमोद कर्जाची वेळेवर परतफेड करीत नसल्याने दोघांमध्ये वाद झाला. चंद्रशेखर याने प्रमोदला मारहाण केली इतकेच नव्हे तर तुझ्या बायकोला पाठव अशी भाषा वापरली त्यामुळे प्रमोद चिडला आणि त्याने चंद्रशेखरच्या हत्येचा कट रचला. त्यासाठी कर्जाची रक्कम न्यायला बोलावले. यावेळी चंद्रशेखर आणि त्याचा भाऊ दोघेही प्रमोदला भेटायला गेले असता त्याने दारू मधून विष पाजून त्यांची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी ...पान ६ वर

## लॉजवरचा वाद अखेरचा ठरला प्रियकराने प्रेयसीचा गळा चिरला

नागपूर : क्राईम रिपोर्टर

आजकालची प्रेम प्रकरणे तकलादू असतात. प्रेमाच्या नावाखाली एकत्र यायचे काही दिवस मौजमजा करून नंतर वेगळे व्हायचे, असे सर्वत्र सुरु आहे. तर काही ठिकाणी प्रेमात संशय निर्माण झाला कि सरळ प्रेयसीचा जीव घ्यायचा अशाही घटना घडत आहेत. नागपूरच्या ओयो हॉटेलमध्ये एक प्रेमी जोडपे थांबले होते. या दोघांमध्ये काही कारणावरून वाद झाला. त्यानंतर प्रियकराने प्रेयसीचा गळा चिरून तेथून पोबारा केला. पोलीस या प्रकरणी आरोपी प्रियकराचा शोध घेत आहे.




नागपूरमधील कळमेश्वर रोडवरील फेटरी गावाच्या परिसरात हे तरूण जोडपं एका हॉटेलमध्ये मुक्कामासाठी गेलं होतं. ओयो हॉटेलमधे दोघांमध्ये झालेल्या वादातून प्रियकराने चाकूने प्रेयसीच्या गळ्यावर वार केला. यामध्ये तरुणी गंभीर जखमी झाली आणि काही वेळात तिचा मृत्यू झाला. हत्या करून आरोपी प्रियकराने हॉटेलच्या पहिल्या मजल्यावरून उडी मारुन पळ काढला. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून फरार प्रियकराचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. समोर आलेल्या माहितीनुसार मृत तरुणीचे नाव रुचिता भांगे असं असू तिचे वय अंदाजे २२ आहे. या घटनेतील प्रियकराचे नाव सौरव जामगडे असे आहे. या घटनेबाबत पोलिसांनी अशी ...पान २ वर

02 TO 08 FEBRUARY 2026 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/31/2026 8:39 PM Page 1



पान १ वरून...

## दोघांच्या भांडणात मध्यस्थी करून...

भावाचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. मावस बहीण आणि तिच्या पतीच्या भांडणात नातेवाईक मावस भावाने मध्यस्थी केली. या रागातून पतीच्या तीन भावांनी आपसात संगनमताने मध्यस्थी करणाऱ्या चुलत भावाला लोखंडी सुऱ्याने भोसकून जीवे ठार मारल्याची खळबळजनक घटना घडली आहे. ही घटना भिवंडीतील शांतीनगर येथील न्यू आझाद नगर मधील निजामिया हॉटेलजवळ घडली असून या घटनेने परिसरात एकच शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करत तीन आरोपींना अटक पोलिसांनी दिली आहे. दिलशाद मकबूल अहमद शहा (२३) असे मृतकाचे नाव आहे. तर या हत्येप्रकरणी आसीफ अब्दुलहकीम शहा, अलीहसन अब्दुलहकीम शहा, मुझफ्फर अब्दुलहकीम शहा अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपी भावांची नावे आहेत. फिर्यादी गुलजार मकबूल अहमद शहा (२५) याचा कपडा विक्रीचा व्यवसाय असून मयत दिलशाद आणि गुलजार हे दोघे सख्खे भाऊ आहेत. दरम्यान गुलजार ने त्याच्या मावस बहीण व तिच्या पतीमध्ये २५ जानेवारी रोजी झालेल्या भांडणात मध्यस्थी करून भांडण सोडवले होते. त्यामुळे या तिघा आरोपींनी आपसात संगनमताने गुलजारने भांडण सोडवल्याचा राग मनात धरून याचा काटा गुलजारचा भाऊ दिलशादवर काढून आसिफने त्याच्याकडील सुऱ्याने भोसकून दिलशादची निर्घुण हत्या केल्याचं तक्रारदार गुलजारने फिर्यादीत म्हटले आहे. तसेच, दिलशाद यास मारहाण होत असतानाच गुलजार हा भांडण सोडवण्यासाठी गेला असता त्यालाही मुझफ्फरने लोखंडी पाईपने मारहाण करून जखमी केले आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच शांतीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दिलशाद यास उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला उपचारापूर्वीच मयत घोषित केले असून त्याचा मृतदेह शवविच्छेदना करिता पाठवण्यात आला आहे. त्यानंतर फॉरेन्सिक टीमने घटनास्थळी दाखल होत हत्येतील नमुने जमा करून तपास सुरू केला आहे. या हत्येप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी तिघांच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करून अटक केली आहे.

## व्यसनी पतीवरील भयंकर राग ...

११ वर्षाचा मुलगा साईराज याचा मृत्यू झाला. तर त्याची मोठी बहीण,१३ वर्षाची धनश्री ही गंभीर जखमी झाली आहे. तिला उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सोनी यांच्या घरात घडलेल्या हत्याकांडानंतर शेजाऱ्या-पाजाऱ्यांनी पोलिसांना कळवलं. ते घटनास्थळी दाखल झाले तेव्हा संपूर्ण घरात, पांढऱ्या शुभ्र फरशीवर रक्ताचा सडा पडेलला होता. ११ वर्षाचा मुलगा मृतावस्थेत जमिनीवर होता, तर मुलगी गंभीर जखमी होती. सोनी यांनी त्यांच्या ११ वर्षाच्या मुलाची गळा चिरून हत्या केली, तर मुलगी धनश्री हिच्यावर सपासप वार केल्याची माहिती समोर आली आहे. त्यांचा आवाज ऐकून शेजारी धावत आले पण समोरचं दृश्य पाहू दारातच थबकले. कोणीतरीह पोलिसांन कळवल्यावर, पोलिसांचं पथक घटनास्थी आलं, त्यांनी जखमी मुलीला उपचारांसाठी रुग्णालयात हलवल. तर मुलाचा मृतदेह ताब्यात घेऊन तो पोस्टमॉर्टमसाठी पाठवला. मुलांवर हल्ला करणाऱ्या सोनीला पोलिसांनी अटक केली असून तिच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र तिने नेमकं हे कृत्य का केलं, आपल्याच मुलाला का मारलं, मुलीवर प्राणघातक हल्ला का केला ? याचं कारण अजून समोर आलेलं नाही. पोलिसांनी तिची चौकशी सुरू केली आहे असून भयानक हत्येच कारण शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र या गुन्हेगारी घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे . निष्पाप मुलाच्या हत्येमुळे आणि मुलीवर झालेल्या हल्लयामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## पैशांसमोर दोस्ती यारी कुठली...

बोला असे बोलून मागचे वाद विसरण्याचा दिवस उजाडला. मात्र याच दिवशी कटू आवाज ऐकून आपल्यावर प्राणघातक हल्ला होणार असल्याचे बाळूच्या ध्यानीमनी देखील नव्हते. या दिवशी रात्री आठ वाजेच्या सुमारास आकाशने बाळूला त्याच्या मोबाईलवर कॉल केला. बस स्थानकावर उभा असलेला आकाश हा त्याच्या मोबाईलवरुनपलीकडे बाळूला शिवीगाळ करु लागला. तु बस स्टँडवर ये आज तुझा काटाच काढतो असे म्हणत आकाश हा बाळूला शिवीगाळ करत होता. त्यावेळी बस स्थानकावर बाळूचा भाऊ नरेंद्र उभा होता. आपल्या भावाला आकाशकडून होत असलेली शिवीगाळ नरेंद्र कोळी ऐकत होता. काही वेळातच बस स्थानकावर बाळू आला आणि आकाशच्या समोर हजर झाला. तु मला शिवीगाळ का करतो असे बाळूने आकाशला प्रश्न केला. त्यावेळी आकाशचे नातेवाईक रामकृष्ण कोळीव प्रकाश कोळी हे देखील काही वेळातच बस स्ठानकावर आकाशचे समर्थन करण्यासाठी हजर झाले. आकाशसोबत सर्वजण बाळूला शिवीगाळ व चापटा बुक्क्यांनी मारहाण करु लागले.

आपल्या भावाला शिवीगाळ व मारहाण होत असल्याचे बघून बाळूचा भाऊ नरेंद्र याच्यासह कृष्णा अरुण कोळी, गोपाल अशोक कोळी, जयेश बाळु कोळी, विशाल बाळु कोळी असे सर्वजण भांडण सोडवण्यासाठी सरसावले. मात्र कुणाला न जुमानता रामकृष्ण ताराचंद कोळीव प्रकाश ताराचंद कोळी यांनी बाळु कोळी यास घट्ट पकडून ठेवले. बाळूला दोघांनी पकडून ठेवल्याचा गैर फायदा घेत आकाशने त्याच्यावर पाठीमागून धारदार कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. बाळूच्या मानेवर दोन ते तिन वेळा जोरदार प्राणघातक हल्ला झाल्याने त्याच्या मानेतून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरु झाला. रक्तबंबाळ झालेला बाळू काही क्षणातच जमीनीवर कोसळला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या बाळूची अवस्था बघून त्याचा भाऊ नरेंद्र आणी इतरांनी मिळून आकाशच्या हातातील लोखंडी कोयता हिसकावण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत नरेंद्रचा पुतण्या जयेश कोळी याच्या हातावर आकाशने कोयत्याने हल्ला केला. त्यात जयेश जखमी झाला. झटापटी दरम्यान नरेंद्रच्या कमरेवर आकाशने हल्ला चढवला. त्यात त्याला देखील दुखापत झाली. आपल्याला विरोध होत असल्याचे बघून आकाशने त्याच्या ताब्यातील गावठी पिस्टल दाखवून दोघांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या कालावधीत घटनास्थळावर गर्दी जमा होण्यास सुरुवात झाली. लोकांची गर्दी जमण्यास सुरुवात झाल्यानंतर भांडणाची सोडवासोडव झाली आणि हल्लेखोर आकाश तेथून निघून गेला. रक्ताच्या थारोळ्यातील बाळूला बघून काही जणांना भोवळ आली आणि ते बेशुद्ध पडले. जखमी बाळूवर वैद्यकीय उपचार लागलीच होण्यासाठी परिस्थितीचे भान ठेवत जयेश कोळी व कृष्णा कोळी या दोघांनी त्याला मोटार सायकलवर बसवून लागलीच जळगाव येथे शासकीय रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणीअंती बाळूला मयत घोषित केले. दरम्यानच्या कालावधीत घटनास्थळावरुन पळून गेलेला हल्लेखोर आकाश कोळी हा त्याच्या घरात आतून दरवाजा बंद करुन लपून बसला होता. त्याचवेळी त्याचा चुलत भाऊचेतन कोळी हा जळगाव येथे मजुरी काम करण्यासाठी मोटार सायकलने जात होता. त्याला रस्त्याने जात असल्याचे घरात लपून बसलेल्या आकाशने खिडकीतून पाहिले. चुलत भाऊ चेतन खिडकीतून दिसताचआकाशने त्याला बघून जोरात आरोळी मारली. आकाशने खिडकीतूनच त्याला जवळ बोलावून सोबत येऊ देण्याची विनंती केली. चेतन सोबत गावातून गुपचूप पळून जाण्यात आकाश यशस्वी झाला. आकाशला गावातून पळवून नेण्यास चेतन याने मदत केली. त्यामुळे गावक-यांच्या रोषाला सामोरे जाण्यापासून आकाशची सुटका झाली. जळगावच्या दिशेने दोघे जात असतांना बाळू मरण पावल्याची दोघांना माहिती समजली. त्यामुळे गावातील वातावरण बिघडण्याची शक्यता लक्षात घेत आकाशने अन्यत्र पळून जाण्याचा बेत आखला. आकाशने गुन्हा केला असल्याची माहिती असून देखील त्याला चुलत भाऊ चेतन याने पळून जाण्यास साथ दिली होती. दोघे जण मोटार सायकलने चोपडा तालुक्यातील एका नातेवाईक महिलेच्या घरी गेले. आम्ही शिरपूर येथे कामानिमीत्त गेलो होतो. मात्र उशीर झाल्याने आम्हाला मुक्काम करायचा आहे असे खोटे सांगून दोघांनी त्या नातेवाईक महिलेकडे रात्रभर मुक्काम केला. या कालावधीत मरण पावलेल्या बाळूचा भाऊ नरेंद्र कोळी याने दिलेल्या फिर्यादीनुसार जळगाव तालुका पोलिस स्टेशनला संशयीत हल्लेखोर आकाशकोळी, रामकृष्ण कोळी, प्रकाश कोळी यांच्याविरुद्ध बाळू कोळी याच्या खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु.र.नं. ९/२०२६ भारतीय न्याय संहिता १०३ (१), ११८ (२), ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३(५) सह आर्म ॲक्ट ३/२५, ४/२५ नुसार हा गुन्हा नोंद करण्यात आला. पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु करण्यात आला. पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्या पथकातील सहायक पोलिस निरीक्षक अनंत अहिरे, हे.कॉ. प्रदीप राजपूत, हे.कॉ. प्रकाश चिंचोरे,पोलिस नाईक ज्ञानेश्वर कोळी,सोपान पाटील, जयेंद्रसिंग पाटील आदींचे पथक हल्लेखोर संशयीत आरोपींच्या मागावर निघाले. तांत्रिक तपासाच्या मदतीने चोपडा तालुक्यातील नातेवाईक महिलेकडे हल्लेखोर संशयीत आरोपी आकाश कोळी हा त्याचा चुलत भाऊ चेतन कोळी याच्यासोबत पोलिसांच्या हाती लागला. अधिक तपासात चेतन कोळी याने आकाश कोळी यास पळून जाण्यास मदत केल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे चेतन कोळी याला देखील संशयीत आरोपी करण्यात आले. क्रमाक्रमाने सर्व संशयीतांना अटक करण्यात आली. पोलिस निरीक्षक शशिकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरु आहे.

## उसाचे वाढे नेण्यास विरोध ...

शेतकरी हे ऊसाचे वाढे जनावरांना चारा म्हणून घेत असल्याने त्या ऊसाच्या वाढायांना ही चांगला भाव मिळत असल्याने अनेक शेतकरी हे आपल्या शेतातील ऊसाचे वाढे कोणाला देत नाहीत बाहेरच्या शेतकऱ्यांना तर त्या वाढयांना हात ही लावून देत नाहीत तरी ही अनेक जण जेथे ऊस तोडणी चालू आहे तेथे जावून फुकटचे ऊसाचे वाढे गोळा करीत असतात. कडेगाव तालुक्यातील ढाणेवाडी येथे विनायक प्रभाकर ढाणे हे आपले आई वडिल पत्नी मुलासह राहयला आहेत. त्याची गावाच्या बाहेर शेती आहे. विनायक हे शेती बरोबर बाहेर एके ठिकाणी नोकरी करीत होते. त्याची घरची शेती त्याचे आई वडिल पाहत असत. पश्चिम महाराष्ट्र हा ऊसाचा पट्टा असल्याने बहुतांश शेतकरी हे ऊसाची शेती करीत असताना दिसतात. कारण यात कमी प्रमाणात कष्ट आणि जास्त प्रमाणात नफा हा मिळत असतो, त्यामुळे ऊसाची शेती ही बऱ्याच जणांना परवडत आहे. त्यातच ऊसाची एक रक्कमी बिले साखर कारखान्याकडून मिळत असल्याने शेतकऱ्याच्या हातात ही जास्त पैसे खेळत असतात. तरी ही हल्ली अनेक शेतकऱ्याच्या मते ऊसाची शेती ही परवडत नाही असे त्याचे मत आहे. विनायक ढोणे याच्या चुलत्याच्या शेतातील ऊस तोडणी चालू होती. त्याची ऊस तोड झाली की, लागलीच विनायक ढोणे याच्या शेतातील ऊस तोड होणार होती. म्हणून विनायक ढोणे हे चलुत्याची ऊस तोडणी चालू असताना शेतात ऊस तोड पाहणी करण्यासाठी गेले. हल्ली जनावरांना चारा म्हणून ऊसाचे वाढे लागते त्याची बेजमी म्हणून काही शेतकरी हे जेथे ऊस तोडणी चालू आहे तेथ ऊसाचे वाढे गोळा करण्यासाठी जात असतात. बऱ्याचदा ज्या शेतकऱ्याची ऊस तोडणी चालू असते ते शेतकरी बाहेरच्या लोकांना ऊसाचे वाढे गोळा करण्यास मज्जाव करीत असतात. ऊसाच्या वाढयाचा दर ही जास्त असल्याने शेत मालक हे ऊस तोड झाल्यानंतर ऊसाचे वाढे जनावरांना चारा म्हणून खायला घालण्यासाठी बरेच जण ते वाढे नेत असतात. बाहेरच्या लोकांना ते वाढे देण्यापेक्षा आपल्याच जनावरांना चारा म्हणून उपयुक्त होते. बाहेरून चारा विकत आणण्याऐवजी आपल्याच शेतातील चारा बरा हा शेतकऱ्याचा उद्देश असतो. गुरूवार दि.२९ जानेवारी २०२६ रोजी विनायक ढोणे याच्या चुलत्याच्या शेतात ऊस तोड चालू होती. त्यावेळी विनायक ढोणे हे तेथे होते. तोडणी चालू असताना तेथे खेराडे वांगी येथील हुनमंत तानाजी सुर्यवंशी, त्याचा मुलगा सुरज आणि पंकज हे तिघे जण ढोणे याच्या शेतात ऊसाचे वाढे गोळा करण्यासाठी आले. त्यावेळी ते तिघे ऊसाचे वाढे गोळा करीत असताना विनायक ढोणे यांनी त्यांना पाहिले. त्यांनी सुर्यवंशी यांना लांबून आवाज देत, ओ ऊसाचे वाढे घेऊन जावू नका, ते आम्हाला लागणार आहे असे सांगितले. तरी ही हनमुंत आणि त्याची मुले ऊसाचे वाढे गोळा करू लागले. सांगून ही ते तिघे ऐकत नाही म्हणून विनायक यांना राग आला. ते त्यांना शिव्या देतच त्याच्या जवळ आले. सुर्यवंशी यांनी ऊसाचे वाढे गोळा करून त्याचा बिंडा बांधला होता. कमीत कमी ५०० ते ६०० रूपयाचे ते वाढे असावेत असा अंदाज विनायक यांना आला. ते त्यांना शिव्या देत त्यांनी बांधलेला बिंडा काढून घेऊ लागले. त्यावेळी हनुमंत सुर्यवंशी आणि त्याच्यात ढकला ढकली झाली. विनायक हे हनुमंत सुर्यवंशी यांना शिव्या देत मारहाण करायला त्याच्या अंगावर जात असताना सुर्यवंशी याची मुले पंकज आणि सुरज हे विनायक यांच्या अंगावर गेले. ते ही विनायक याला अर्वाच्च भाषेत शिव्या घालत तुझ्या शेतातील वाढे कशाला आम्ही नेऊ तुझी तोडणी चालू नाही आणि कशाला आम्हाला ओरडतोस म्हणून त्याला ते तिघे ही खाली पाडून त्याच्या पायाला पोटात लाथा बुक्कयांनी मारहाण करायला सुरूवात ते तिघेजण होते तर विनायक हा एकटा होता. त्याच्या झटापट सुरू झाली. पंकज आणि सुरज यांनी विनायक याला खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारायला सुरूवात केली. तसे विनायक हा जोर जोरात ओरडू लागला. त्यांच्या ओरडण्याच्या आवाजाने विनायक याचे आई क्षमादेवी ढाणे वडिल प्रभाकर ढाणे आणि काका आणि आत्या आक्काबाई ढाणे यांनी विनायक याला सुर्यवंशी याच्या तावडीतून सोडवायला तेथे आले. त्यावेळी पंकज सुरज आणि हनुमंत यांनी सोडवायाला आलेल्यांना देखील मारहाण केली. या मारहाणीत सुर्यवंशी यांनी त्याच ऊसाच्या वाढयाने त्या तिघांना ही चोप दिला. विनायक याला तर त्यांनी त्याच्या तोंडातून रक्त येई पर्यत मारहाण केली. त्यात विनायक हे गंभीर जखमी झाले. सकाळी ९.३०च्या दरम्यान शेतात ऊस तोडणी चालू असताना हा किरकोळ कारणातून राडा निर्माण झाला होता. सुर्यवंशी हे विनायक यांना मारहाण करून तु खेराडीला येवूनच दाखव तुझे हात पाय तोडतो की नाही ते बघ असे म्हणत त्याला तुडवत होते. सकाळी ऊस तोड चालू असताना ढाणे याच्या शेतात मारामारी झाली असल्याचे समजताच ढाणेवाडी येथील काही लोक ढाणे यांच्या शेतात आले. लोक गोळा होऊ लागल्याने हनुमंत सुर्यवंशी आणि त्याच्या मुलांनी तेथून ऊसाचा घेतलेला बिंडा तेथेच टाकून दिला आणि निघून गेले. विनायक हे गंभीर जखमी झाले असल्याने त्यांना उपाचारासाठी कडेगाव येथील सरकारी दवाखान्यात दाखल करण्यात आले. दवाखान्यातील डॉक्टरांनी त्यांना तपासून त्याचा उपचारापूर्वीच मृत्यु झाला असल्याचे नातेवाईकांना सांगितले. यावेळी विनायक यांचे वडिल आई आणि आत्या हे तिघे गंभीर जखमी झाले असल्याने त्याचेवर ही तेथे उपचार सुरू होते. या घटनेची माहिती लागलीच कडेगाव पोलीसांना मिळाल्याने त्यांनी तातडीने सरकारी दवाखान्यात आणि घटनास्थळी जावून या घटनेची पाहणी केली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहेत याची पोलीसांना माहिती मिळाली होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनाम करून या घटनेतील संशयतीचा शोध घ्यायला सुरूवात केली. खराडे वांगी येथून दुपारी लागलीच हनुमंत सुर्यवंयी, पंकज सुर्यवंशी आणि सुरज सुर्यवंशी यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना कडेगाव पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्या तिघांनी नाही होय म्हणत आपला गुन्हा कबुल केला. त्यांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची फिर्याद मयत विनायक ढाणे याच्या पत्नीकडून घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी विनायक प्रभाकर ढाणे (वय ३५) प्रभाकर ढाणे क्षमादेवी ढाणे आणि आक्काबाई ढाणे यांना मारहाण केल्याप्रकरणी तसेच विनायक ढाणे यांच्या खून प्रकरणी त्याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) आणि वेगवेगळ्या कलमाखाली हनुमंत तनाजी सुर्यवंशी (वय ४०) त्याची मुले पंकज हनुमंत सुर्यवंशी (वय २४) आणि सुरज हनुमंत सुर्यवंशी (वय २६) रा.तिघे ही खेराडे वांगी याच्या विराधात गुन्हा दाखल केला. कडेगाव पोलीसांनी त्याना कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या घटनेचा पुढील तपास कडेगाव पोलीस स्टेशनचे सपोनि गणेश कोकाटे याच्या मार्गदर्शना खाली पोलीस करीत आहेत.

## दारू सोड म्हणताच संतापाने ...

असता पती-पत्नीमध्ये पुन्हा भांडण झाले. त्यानंतर जिजाबाई या गाढ झोपेत असताना संतप्त झालेल्या जयराम यांनी घरातील धारदार शस्त्र काढून त्यांच्यावर झोपेतच सपासप वार केले. या हल्लयात जिजाबाई यांचा जागीच मृत्यू झाला. पत्नी रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे पाहून घाबरलेल्या जयराम याने देखील पिकांवरील कीटकनाशक पिऊन स्वतः आपले जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. सकाळी ही घटना उघडकीस येताच ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. जय राम पवार यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आल्या असून सध्या त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. समाजातील एका जबाबदार पदावर असलेल्या व्यक्तीने व्यसनाच्या आहारी जाऊन अशा प्रकारे स्वतःच्या पत्नीचाच जीव घेतल्याने परिसरात संताप आणि हळहळ व्यक्त होत आहे. याबाबत कळवण पोलिसांकडून गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे.

## रक्ताच्या नात्यात सूडाचा वणवा...

रचत असल्यामुळे घाबरलेल्या मुलाने बापावरच हल्ला केला आणि त्याचा जीव घेतला. याप्रकरणात मुलाच्या हातून बापाचा खून झाला आणि मुलगा तुरूंगात गेला. त्या घरावर दुःखाचा डोंगर कोसळला. नांदगाव तालुक्यातील जातेगावामध्ये विठ्ठल तुकाराम गायकवाड हा त्याची पत्नी झंबरबाई, मुलगा श्रीकृष्ण उर्फ सावता आणि मुलगी राधा यांच्यासह रहात होता. त्यांचा मुलगा श्रीकृष्ण उर्फ सावता विठ्ठल गायकवाड हा २० वर्षाचा असून तो स्वतःचे पिकअप वाहन चालवतो. विठ्ठल तुकाराम गायकवाड हा त्याच्या गावानजीकच्या मळ्यातील खोलीत रात्रीच्या वेळी झोपत असे. विठ्ठल यास पूर्वीपासून दारू पिण्याचे व्यसन होते आणि दारू पिवून तो पत्नी व मुलांना सतत अर्वाच्च भाषेत शिवीगाळ मारहाण करत असे त्याच्या या वागण्याने सर्व जण वैतागले होते, त्यामुळे विठ्ठल आणि मुलगा श्रीकृष्ण या दोघांमध्ये सतत भांडणे व्हायची. त्यातच विठ्ठल हा मुलगा श्रीकृष्णला पाण्यात पाहू लागला होता. मुलगा आता त्याला नकोसा झाला होता, त्यामुळे त्याच्या मनात मुलाविषयी वाईट विचार सुरू झाले होते. दि. ३ जानेवारी २०२६ रोजी विठ्ठल व मुलगा श्रीकृष्ण असे दोघे जण आपल्या शेतात गेले होते. दुपारच्या वेळी विठ्ठलने मुलगा श्रीकृष्णला इलेक्ट्रीकचा शॉक लागेल आणि तो मरून जाईल या विचाराने विजेचा करंट तारांमध्ये सोडून ठेवला होता, मात्र ही गोष्ट श्रीकृष्णच्या लक्षात आल्याने तो वाचला. वडीलांचे कटकारस्थान उघडकीस आल्यावर दोघाबाप-लेकांचे, कडाक्याचे भांडण झाले. त्यात विठ्ठलने मुलाच्या पाठीवर दगड मारून जखमी केले, तेंव्हापासून श्रीकृष्णच्या मनात वडीलांविषयी तीव्र राग-संताप निर्माण होवून तिरस्कार निर्माण झाला होता. आपला बाप आपल्याला मारून टाकायचा विचार करतो आहे, त्यासाठी आपल्याविरोधात कट कारस्थान व षडयंत्र रचत असल्याने श्रीकृष्णने बापालाच संपवण्याचा निर्णय घेतला. श्रीकृष्ण याला बापाविषयी भीती वाटू लागली होती. वडील आपल्याला केंव्हाही जिवानिशी ठार मारतील अशी धास्ती त्याला लागली होती. त्या भीतीमुळे वडीलांनी आपल्याला ठार मारण्याऐवजी आपणच त्यांना ठार मारू असा निर्धार त्याने केला.दि. ४ जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास वडील विठ्ठल हे मळ्यातील घरी झोपण्यासाठी गेल्याचे श्रीकृष्णने पाहिले. आज काही झाले तरी वडीलांना सोडायचे नाही असा विचार करून त्याने झोपेचे सोंग घेतले आणि रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास तो उठला. वडील झोपी गेले असतील म्हणून श्रीकृष्ण घरातील कोणीही जागे होवू नये याची काळजी घेत हळूच घराचा दरवाजा उघडून बाहेर पडला. तो वडील झोपलेल्या दिशेने मळ्याकडे निघाला. श्रीकृष्ण मळ्यात पोहोचल्यानंतर त्याने आजूबाजूचा कानोसा घेतला. त्याच्या वडीलांनी खोलीला आतून कडी लावलेली नव्हती. दरवाजा केवळ लोटलेला असल्याचे श्रीकृष्णला आढळून आले. त्याने तो दरवाजा हळूच उघडला, तेंव्हा वडील खोलीत झोपलेले असल्याचे त्याला दिसले. वडीलांना पाहून त्याचा संताप अनावर झाला आणि खोलीत असलेला लोखंडी पाईप हातात घेवून त्याने वडीलांच्या डोक्यावर व तोंडावर सपासप वार करून वडीलांना जीवे ठार मारले. वडीलांचा मृत्यू झाल्याची खात्री पटल्यानंतर तो घरी येवून झोपी गेला. विठ्ठल मळ्यातील घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. ही बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. जगन्नाथ नामदेव गायकवाड हा त्यांचा चुलत भाऊही घटनास्थळी येवून दाखल झाला. खबर मिळताच नांदगाव पोलिसांनीही घटनास्थळी धाव घेतली. सर्वांनी मळ्यातील घरात जावून पाहिले असता हा खूनाचा प्रकार असल्याचे सर्वांना दिसले. खोलीत विठ्ठल मृतावस्थेत पडलेला होता. त्याच्या डोक्यावर, तोंडावर व ओठावर कठीण हत्याराने गंभीर जखमा केल्याचे दिसत होते. त्या जखमांमधून मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाला होता. तसेच बिछान्यावर रक्ताचा सडा पडलेला होता. पोलिसांनी घटनास्थळ व मृतदेहाचा पंचनामा केला आणि मृतदेह विच्छेदनासाठी रूग्णालयात पाठवला. पोलिसांनी आजूबाजूच्या लोकांकडे विचारपूस केली त्यावेळी श्रीकृष्ण हा देखील तेथे हजर होता. पोलिसांनी विश्वासात घेवून त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने गुन्ह्याची कबुली देत सांगितले की माझ्या वडीलांना दारूचे व्यसन होते. दारू प्याल्यावर ते आम्हाला शिवीगाळ करून मारहाण करत असत. दि. ३ जानेवारी २०२६ रोजी मी त्यांच्यासोबत मळ्यात गेलो असता त्यांनी मला शॉक बसावा आणि मी मरून जावे यासाठी इलेक्ट्रीक करंट सोडले होते. त्यावरून आमच्यात भांडण झाले असता त्यांनी माझ्या पाठीवर दगड मारून मला जखमी केल्यामुळे मला त्यांचा राग आला होता आणि रात्री ते मळ्यातील खोलीत झोपावयास गेले असता रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास मळ्यात जावून ते झोपेत असतांना मी लोखंडी पाईपने मारहाण करून त्यांचा खून केल्याची कबुली श्रीकृष्ण याने दिल्याने पोलिसांनी लगेच त्याला ताब्यात घेतले. जगन्नाथ नामदेव गायकवाड रा. जातेगाव, ता. नांदगाव यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार नांदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ०८/२०२६ बी. एन. एस. १०३ कलमाखाली बापाचा खून केल्याचा गुन्हा श्रीकृष्ण उर्फ सावता विठ्ठल गायकवाड (२०) याच्याविरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्याला अटक केली. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक तेगबिरसिंग, उपअधीक्षक बाजीराव महाजन व पोलीस निरीक्षक दिगंबर भदाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश गावित गुन्ह्याचा अधिक तपास करत आहेत.

## प्रेम विवाहामुळे संसाराचे स्वप्न ...

कुटुंबाच्या विरोधात जाऊन प्रेमसंबंधातून झालेल्या विवाहाचा राग धरुन भावाने हॉटेलमध्येच मद्यप्राशन करताना नशेतच बहिणीच्या समोर दारुची बाटली फोडली अन् पतीचा गळा चिरला. बहिणीच्या पतीने दवाखान्यात अखेरचा श्वास घेतला. रागाच्याभरात केलेल्या या कृत्यानं सख्ख्या बहिणीचं कुंकू पुसलं गेलं आहे. या घटनेनं बार्शी तालुक्यासह, सोलापूर जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे. वैजिनाथ बंकट क्षीरसागर (वय २६, रा. अरणगाव, ता. बार्शी) यांनी पांगरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी संशयीत आरोपीला अटक केली असून सध्या तो पोलिसांच्या ताब्यात आहे. सुशील व रेश्मा यांचा प्रेमविवाह झाला होता. मात्र, या विवाहाला रेश्माच्या कुटुंबीयांचा विरोध होता. सुशील व त्याची पत्नी रेश्मा हे दोघे कामानिमित्त पुणे येथे वास्तव्यास होते. सुशील हा वाहनचालकाचे काम करत होता तर, रेश्मा ही पुण्यातील एका खासगी दवाखान्यात काम करत होती. वर्षभरापूर्वी दोघांनी कुटुंबाच्या विरोधात जाऊन लग्न केले होते. सुशीलच्या मावशीच्या कार्यक्रमानिमित्त दोघे येडेश्वरी येथे आले होते. त्यानंतर ते उक्कडगाव येथे सासू व सासऱ्याकडे गेले होते. संशयीत आरोपी आरोपी ऋषिकेश याने २८ जानेवारी बुधवारी रोजी रात्री 'आपण सर्वजण हॉटेलवर जेवायला जाऊ', असं सांगितलं. सुशील, पत्नी रेश्मा, रेश्माचा भाऊ ऋषिकेश, त्याची मैत्रीण काजल सुरज मिसाळ (रा. पुणे) व मामा मच्छिंद्र भीमा चव्हाण हे सर्वजण पांगरी येथील हॉटेल शिवनेरीत जेवणासाठी गेले होते. जेवणाच्यावेळी रेश्मा हिच्या विवाहाच्या कारणावरून 'आपल्या दोघांचीही आडनावे एकच असून, हे लग्न कसे केले', असे आरोपी ऋषीकेशने म्हटल्यानंतर बहीण रेश्मा 'आमचे प्रेमसंबंधातून लग्न झालेले आहे, तू त्यांना काही बोलू नकोस', असे म्हणाली. यावरून सुशील व ऋषिकेश यांच्यात वाद झाला. रेश्माच्या लग्नावरून ऋषीकेशने जाणूनबुजून वादाला सुरुवात केली. वाद विकोपाला गेला आणि ऋषिकेशने हातातील दारूची बाटली फोडून सुशीलच्या गळ्यावर वार केला. या हल्लयात सुशील गंभीर जखमी झाला व त्याच्या गळ्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. हॉटेल मालक अण्णा घावटे यांनी जखमी सुशीलला खासगी वाहनाने ग्रामीण रुग्णालय, पांगरी येथे दाखल केले. तेथून पुढील उपचारासाठी त्याला जगदाळेमामा हॉस्पिटल, बार्शी येथे हलविण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले.

## लॉजवरचा वाद अखेरचा ...

माहिती माहिती दिली की, रुचिता आणि सौरव हे काल सायंकाळच्या सुमारास फेटरी परिसरातील एका OYO हॉटेलमध्ये गेले होते. या दोघांमध्ये वाद होता. हॉटेलमध्ये मुक्कामी असताना या दोघांमधील वाद वाढला. दोघांमधील वाद वाढल्याने रागाच्या भरात सौरवने रुचिताच्या गळ्यावर चाकूने वार केला. यात ती गंभीर जखमी झाली व तिचा काही काळानंतर तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर ओरोपी सौरव पळून गेला. आज सकाळी हॉटेल कर्मचाऱ्यांना खोलीतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्यांनी दरवाजा तोडला. यावेळी कर्मचाऱ्यांना रुचिताचा मृतदे आढळला. यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. सध्या पोलिस आरोपीच्या शोधात आहेत. पोलिसांनी सौरवचा शोध घेण्यासाठी वेगवेगळी पथके रवाना केली आहेत. सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. आरोपीला लवकरात लवकर अटक केली जाईल अशी अशा पोलिसांनी व्यक्त केली आहे.

## सिकलसेल निमिया विशेष अभियानाअंतर्गत आरोग्य संचालक व उपसंचालकांची पालघर जिल्ह्यात पाहणी

**पालघर : वार्ताहर**

सिकलसेल निमिया विशेष अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पालघर जिल्ह्यात राज्यस्तरीय पर्यवेक्षण करण्यात आले. या अनुषंगाने राज्य आरोग्य विभागाचे मा. डॉ. आंबाडेकर, संचालक, आरोग्य सेवा तसेच मा. डॉ. नांदापुरकर, उपसंचालक, मुंबई मंडळ (ठाणे) यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र खोडाळा अंतर्गत असलेल्या वाकड पाडा उपकेंद्रास भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी 'अरुणोदय सिकलसेल निमिया विशेष अभियान' मोहिमेअंतर्गत सुरू असलेल्या तपासणी, नोंदणी, उपचार व जनजागृती उपक्रमांचा आढावा घेतला. तसेच ही मोहीम अधिक प्रभावीपणे व यशस्वीपणे राबविण्यासाठी उपस्थित अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत साळुंके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भाऊसाहेब चत्तर, मोखाडा तालुका आरोग्य अधिकारी डॉ. पुष्पा गोवारी, वैद्यकीय अधिकारी तसेच संबंधित आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# मिरा-भाईंदर महापालिकेच्या महापौरपदी पुन्हा 'डिंपल मेहता'



**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

मिरा-भाईंदर महापालिकेच्या महापौरपदी भाजपने दुसऱ्यांदा डिंपल मेहता यांच्या नावाची निवड केली आहे. त्यामुळे ३ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या निवडणुकीत औपचारिक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही माळ त्यांच्या गळ्यात पडणार असल्याचे निश्चित मानले जात आहे. मिरा भाईंदर महापालिकेच्या महापौर पदाच्या निवडीसाठी कोकण विभागीय आयुक्तालयातर्फे ३ फेब्रुवारी रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यासाठी पिठासीन अधिकारी म्हणून सौरभ कटीयार यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार ३० जानेवारी रोजी यासाठी उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्यात आले. विरोधी बाकावर असलेल्या काँग्रेस शिवसेनेच्या एकत्रित मिरा-भाईंदर विकास आघाडीतर्फे महापौरपदासाठी रुबीना फिरोज आणि उपमहापौरपदासाठी वंदना पाटील यांनी अर्ज दाखल केले आहेत. तर भाजपतर्फे महापौरपदासाठी डिंपल मेहता आणि उपमहापौरपदासाठी ध्रुव किशोर पाटील यांची निवड करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर महापालिकेत एकूण ९५ नगरसेवक आहेत. त्यापैकी ७८ जागांवर भाजपने विजय मिळवला असून पक्षाला एकहाती बहुमत प्राप्त झाले आहे. त्यामुळे भाजपचे उमेदवार निवडून येणे सहज शक्य होणार आहे. प्रभाग क्रमांक १२ मधून निवडून आलेल्या डिंपल मेहता या दुसऱ्यांदा महापौरपदाची जबाबदारी स्वीकारणार आहेत. यापूर्वी त्यांनी २०१७ मध्ये अडीच वर्षे महापौरपद भूषवले होते. तर उपमहापौरपदी सलग सहाव्यांदा निवडून आलेले अनुभवी नगरसेवक ध्रुव किशोर पाटील हे जबाबदारी पाहणार आहेत. महापौरपदी मराठी उमेदवाराची निवड करावी, अशी मागणी मराठी एकीकरण समिती व मनसेने केली आहे. मराठी उमेदवार नसेल, तर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

२०१७ साली डिंपल मेहता यांच्या निवडीनंतरही आंदोलन झाले होते. त्यामुळे यंदाही शहरात वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. मात्र, डिंपल मेहता यांचे कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात वास्तव्यास असून त्या महाराष्ट्रीयनच असल्याचा दावा आमदार नरेंद्र मेहता यांनी केला आहे. यंदा महापौरपद सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षित होते. त्यामुळे अनेक अनुभवी महिला नगरसेविकांना आपल्या नावाची वर्णी लागेल, अशी अपेक्षा होती. मात्र हे पद पुन्हा आमदार नरेंद्र मेहता यांच्या वहिनीलाच मिळाल्याने भाजपमध्ये पक्षांतर्गत नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस प्रभाग क्रमांक २२ तर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली!



**पुणे : शंकर जोग**

राष्ट्रवादी काँग्रेस प्रभाग क्रमांक २२ च्या वतीने भवानी पेठ जुना मोटर स्टॅन्ड पुणे येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमा समोर मेणबत्ती पेटवून श्रद्धांजली वाहण्यात आली होती. यावेळी अजित दादा पवार यांची स्मृती श्रद्धांजलीसह आठवणी आणि त्यांच्या कार्याचे कृतज्ञतापूर्वक स्मरण केले. त्यांचा शिक्षण, राजकारण, आणि प्रशासन समाजकारणातील योगदान महाराष्ट्र आणि देशात स्मरणीय राहील असे या शब्दांजली सभेमध्ये व्यक्त करण्यात आले. यावेळी श्रद्धांजली सभेचे आयोजन इस्तियाक बागवान यांनी केले होते. याप्रसंगी माजी नगरसेवक शांतीलाल मिसाळ, पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा अध्यक्ष नरेश जाधव, राहुल तांबे, दिनेश अर्धाळकर, अतुल जाधव, दिनेश परदेशी, युसूफ शेख, अर्चना वाघमारे, रीना अडागळे, योगेश पवार, प्रज्वल बनकर, अब्बास खान आदी यावेळी उपस्थित होते.

# कामण जंगल परिसरात गावठी दारूच्या हातभट्ट्यांवर पोलिसांची छापेमारी; साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**वसई : वार्ताहर**

वसई विरार शहरात विविध ठिकाणच्या भागात छुप्या मार्गाने गावठी दारूच्या हातभट्ट्या लावल्या जात आहे. नुकताच नायगाव पूर्वेच्या कामण परिसरातील जंगलात दोन ठिकाणी गावठी दारूच्या अड्ड्यावर गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी केली आहे. या कारवाईत ३ लाख ६७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. वसई विरार मध्ये जंगल, डोंगर, कांदळवन क्षेत्र अशा विविध ठिकाणच्या भागात गावठी दारू तयार करण्यासाठी हातभट्ट्या लावण्यात येत आहेत. त्यातून तयार होणारी दारू विविध ठिकाणी वितरित केली जात आहे. दिवसेंदिवस गावठी दारू हातभट्टीचे अड्डे वाढत आहेत. अशा बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. विशेषतः अमली पदार्थ तस्करी, डान्सबार, गावठी दारूच्या हातभट्ट्यावर कारवाई करण्यात येत आहे. नुकताच नायगाव पूर्वेच्या कामण बेलकडी जंगल परिसरात अवैधरीत्या गावठी दारू तयार करण्यासाठी हात भट्टी लावली जात असल्याची गुप्त माहिती नायगाव पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाला मिळाली होती. पोलिसांनी तातडीने त्याठिकाणी छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत ३ लाख ६७ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यात ५५० लीटर गावठी दारू व रसायन आणि ती तयार करण्याची साधने यांचा समावेश आहे. या प्रकरणी दोन आरोपीच्या विरोधात गुन्हा नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) विजय कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक गणेश केकान, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर आसबे, पोलीस हवालदार शेखर पचार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, पोलीस अंमलदार चेतन ठाकरे, सचिन खंताळ, अमर पवार, अशोक पाटील, पांडुरंग महाले आदीच्या पथकाने केली आहे.

# प्रजासत्ताक दिनी ६ लाख किंमतीचे हरवलेले ५८ मोबाईल फोन तक्रारदारांना परत!





**नालासोपारा : वार्ताहर**

तुळींज पोलीस ठाणे हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणात दाट लोकवस्ती तसेच गर्दीचे ठिकाण असल्याने दैनंदिन कामाच्या घाईगडबडीमध्ये रेल्वे स्टेशन परिसर तसेच सेंट्रल पार्क, ओसवाल नगरी आठवडा बाजार, दुबे इस्टेट, तुळींज ब्रिजखाली येथे लोकांचे मोबाईल फोन गहाळ झाल्याबाबत पोलीस ठाणे तसेच ऑनलाईन तक्रारी प्राप्त होत असतात. तुळींज पोलीस ठाण्यात दाखल प्रॉपर्टी मिसींगमधील गहाळ मोबाईल फोन यांचा कौशल्यपुर्ण व तांत्रिक माहितीच्या आधारे शोध घेवून, २६ जानेवारी २०२६ रोजी ७७व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून, पोलीस ठाण्यात नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून विविध कंपन्यांचे एकूण ५ लाख ८० हजार रूपये किंमतीचे नागरिकांचे हरवलेले एकूण ५८ मोबाईल फोन तक्रारदार यांना वरिष्ठांच्या हस्ते परत देण्यात आले. याबाबत तक्रारदार यांनी त्यांचा हरवलेला मोबईल फोन परत मिळाल्याने समाधान व्यक्त करून, पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक केले आहे. वरील कामगीरी परीमंडळ-२ वसईच्या पोलीस उपआयुक्त पोर्णिमा चौगुले-श्रींगी, तुळींज विभाग सहा. पोलीस आयुक्त उमेश माने-पाटील, तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय जाधव, पोलीस निरीक्षक (गुन्हे) बाळासाहेब बनकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) आनंद पेंडणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहा. पोलीस निरीक्षक सुनिल पवार, पोहवा. अशफाक जमादार, पांडुरंग केंद्रे, दिगंबर परजने, श्रीधर कांबळे, इस्माईल शाह, छपरीबन, राहुल कदम, अक्षय झांजुर्ने, पोअंम. प्रसाद पालवे, प्रकाश दवने, अनिल सोनवणे, ज्योतीराज झंजे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

# आनंद दिघे जयंतीनिमित्त वाड्यात अभिवादन



**वाडा : वार्ताहर**

हिंदुत्वाचा बुलंद आवाज आणि शिवसेनेचे जेष्ठ नेते आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त वाडा येथील अशोक गड येथे विविध सामाजिक व संघटनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी आनंद दिघे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी आनंद दिघे यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा आणि हिंदुत्ववादी विचारांचा उल्लेख करण्यात आला. सामान्य माणसाच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे नेतृत्व अशी त्यांची ओळख असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. त्यांच्या विचारांवर चालत समाजहितासाठी काम करण्याचा संकल्प उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केला. या प्रसंगी शिवसेनाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम शांततापूर्ण वातावरणात पार पडला. शेवटी सर्व उपस्थितांनी आनंद दिघे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

# वसईतील सेंट फ्रान्सिस हायस्कूलमध्ये ७७वा प्रजासत्ताक दिन संपन्न




**वसई : वार्ताहर**

वसई पश्चिम येथील नामचीन सेंट फ्रान्सिस हायस्कूल मध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या अभिमानाने आणि देशभक्तीच्या उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे लाभले त म्हणजे वसई माणिकपूरचे पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक रमेश दहीगुडे, माजी नौदल अधिकारी रजनीश कुमार, मा एनजीओच्या संस्थापक व अध्यक्षा श्रीमती गीता अहिरे, मुंबई युनिव्हर्सिटीचे धावपटू सचिन गमरे, वर्तक महाविद्यालयाच्या कबड्डी कोच श्रीमती दीक्षा परब, धावपटू योगेश मेहेर, वसई वैभव वर्तमानपत्राचे संपादक हरेश गणपत मोहिते आणि जागरूक वसई वर्तमानपत्राच्या संपादिका सोनल महाडिक यांचे शाळेच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थी मंत्रिमंडळाने पारंपरिक बॅजिंग करून हार्दिक स्वागत केले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रध्वजारोहणाने झाली, त्यानंतर प्रभावी संचलन आणि राष्ट्रगीत व राष्ट्रीय गीताचे गायन झाले. तदनंतर, देवाचा आशीर्वाद घेण्यासाठी बायबलमधील वचन, प्रार्थना, प्रार्थनागीते आणि सुंदर प्रार्थना नृत्ये सादर करण्यात आली. प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व तीन वेगवेगळ्या भाषांमध्ये स्पष्ट करण्यात आले, ज्यात भारताची विविधतेतील एकता आणि घटनात्मक मूल्यांवर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वागतपर भाषणे, सांस्कृतिक नृत्ये आणि सुमधुर देशभक्तिपर गीते सादर केली. रायन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या गौरवशाली ५० वर्षांच्या प्रवासाचे दर्शन घडवणाऱ्या एका विशेष नाटिकेला खूप प्रशंसा मिळाली. या कार्यक्रमात पाहुण्यांचा सत्कार आणि विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल बक्षीस वितरण देखील करण्यात आले. कार्यक्रमाचा समारोप आभारप्रदर्शन, सुमधुर समारोपीय समूहगीत आणि शाळेच्या शालेय गीताने झाला. पालक आणि विद्यार्थ्यांनी सुव्यवस्थित आणि प्रेरणादायी कार्यक्रमाचे कौतुक केले. मान्यवरांनी सुध्दा शाळेचे आभार मानले.

# अजितदादा पवार यांना आदरांजली वाहण्यासाठी वाडा बजारपेठ बंद!



**वाडा : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पार्टीचे सर्वेसर्वा व महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती येथे बुधवारी सकाळी विमान अपघातात दुःखद निधन झाल्याची बातमी समजताच दुखावटा व्यक्त करण्यासाठी वाडा तालुका व्यापारी संघटनेच्या वतीने वाडा बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाचे वृत्त समजताच राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार) पार्टीचे वाडा तालुका अध्यक्ष जयेश शेलार यांनी वाडा व्यापारी संघटनेचे पदाधिकारी व सर्वपक्षीय पदाधीकाऱ्यांची भेट घेऊन वाडा बंदची हाक दिल्याने वाडा व्यापारी संघटनेच्या वतीने दुपारपासून बाजारपेठ कडकडीत बंद ठेवण्यात आली. या बंदला व्यापाऱ्यांनीही या आवाहणाला प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली. तर कुडूस येथील व्यापाऱ्यांनी गुरुवारी बाजारपेठ बंद ठेऊन दादांना श्रंधांजली वाहिनी.

# भाईंदर रेल्वे स्थानकातून धावणार चार नव्या लोकल



**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

कांदिवली आणि बोरीवली रेल्वे स्थकादरम्यान सहाव्या मार्गिकेचे काम पूर्ण झाले असल्यामुळे भाईंदर स्थानकातून १ फेब्रुवारीपासून अप आणि डाऊन धीम्या मार्गांवर चार अतिरिक्त सामान्य लोकल सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे भाईंदर ते चर्चगेट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. पश्चिम रेल्वे स्थानकांपैकी भाईंदर रेल्वे स्थानक हे एक महत्वाचे रेल्वे स्थानक आहे. मुंबई तसेच ठाण्याच्या दिशेने दररोज लाखो प्रवासी या स्थानकातून प्रवास करतात. पण, सकाळ आणि संध्याकाळच्या सुमारास होणाऱ्या गर्दीमुळे प्रवाशांना लोकलने प्रवास करणे कठीण होऊन बसले होते. तर वसई आणि विरार स्थानकातून आधीच प्रवाशांनी भरून येणाऱ्या लोकल, एसी लोकलच्या वाढलेल्या फेऱ्या, अचानक रद्द होणाऱ्या लोकल, कोलमडले वेळापत्रक यामुळे प्रवाशांवर लोकलच्या दरवाज्यावर लटकून धोकादायक प्रवास करण्याची वेळ आली होती. ज्यावेळेस रेल्वे प्रशासनाने एसी लोकलच्या फेऱ्या वाढवण्याची घोषणा केली होती. त्यावेळेस अनेक प्रवाशांनी सामान्य लोकलच्या फेऱ्याही वाढवण्यात याव्यात, अशी मागणी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. त्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी येत्या एक फेब्रुवारीपासून भाईंदर ते वांद्रे आणि भाईंदर ते चर्चगेट या दोन्ही स्थानकांदरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गांवर बारा डब्याच्या लोकलच्या अतिरिक्त दोन-दोन अशा एकूण चार सेवा सुरू करण्यात येणार आहेत. या नवीन सेवांमुळे पश्चिम रेल्वेवरील दैनंदिन सेवांची एकूण संख्या १ हजार ४०६ वरून आता १ हजार ४१० वर पोहोचणार आहे. कांदिवली आणि बोरिवली दरम्यानच्या सहाव्या मार्गाचे बांधकाम पूर्ण झाल्यामुळे ही वाढ शक्य झाली आहे. सहावा मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर, वांद्रे टर्मिनसकडे जाणाऱ्या सर्व लांब पल्ल्याच्या गाड्या बोरिवली आणि वांद्रे टर्मिनस दरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गावर वळवण्यात आल्या आहेत, ज्यामुळे परिचालन कार्यक्षमता सुधारली असल्याची माहिती पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिली आहे. तसेच या सेवा सुरू झाल्यामुळे, काही विद्यमान उपनगरीय सेवांच्या वेळापत्रकात किरकोळ बदल होतील. याची प्रवाशांनी नोंद घ्यावी, असे आवाहनही रेल्वे प्रशासनाने केले आहे.

**अप दिशा (चर्चगेटच्या दिशेने):**

१. भाईंदर ते वांद्रे:
सकाळी ११:३९ वाजता सुटेल.

२. भाईंदर ते चर्चगेट:
दुपारी १२:१४ वाजता सुटेल.

**डाऊन दिशा (विरारच्या दिशेने):**

१. वांद्रे ते भाईंदर:
पहाटे ०४:३० वाजता सुटेल.

२. वांद्रे ते भाईंदर:
दुपारी १३:२१ वाजता सुटेल.

# वसई-विरार महानगरपालिकेत भाजपा गटनेतेपदी अशोक शेळके



**विरार : वार्ताहर**

वसई-विरार महापालिकेत भारतीय जनता पार्टीच्या गटनेतेपदी अशोक शेळके यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. भाजपाच्या ४३ नगरसेवकांच्या झालेल्या बैठकीत अशोक शेळके यांच्या नावावर आज शिक्कामोर्तब करण्यात आले. महापालिका निवडणुकीत भाजपाने ४३ जागा जिंकल्या असून, वसई-विरार महापालिकेत प्रथमच दमदार विरोधी पक्ष म्हणून भाजपाचा उदय झाला आहे. तरुण, अभ्यासू आणि आक्रमक कार्यकर्ता म्हणून अशोक शेळके यांची ओळख आहे. प्रभाग क्र. २२ मधून अशोक शेळके यांच्यासह भाजपाचे संपूर्ण पॅनल विजयी झाले आहे. भाजपाचे गटनेते अशोक शेळके यांनी भाजपा युवा मोर्चाच्या चिटणीसपदावर कार्य करताना अनेक आक्रमक आंदोलने केली. तसेच विविध नागरी समस्यांना वाचा फोडून त्या सोडविण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. भाजपाचे खासदार हेमंत सवरा, संघटन मंत्री हेमंत म्हात्रे, आमदार राजन नाईक, आमदार स्नेहा दुबे-, पंडित, जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील, मा. जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, महामंत्री मनोज बारोट, जोगेंद्रसाद चौबे, विजेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत नालासोपारा येथे नवनिर्वाचित नगरसेवकांची बैठक पार पडली. या बैठकीत गटनेतेपदाची एकमताने निवड करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार अशोक शेळके यांची निवड झाली, अशी माहिती भाजपा वसई विरार जिल्हा महामंत्री मनोज बारोट यांनी माध्यमांना दिली.

**जिल्हा परिषद, पालघर**
**बांधकाम विभाग, मुख्या. जव्हार**
**जिल्हा परिषद, पालघर**

**E-Procurement निविदा सूचना क्र.२१ व २२ सन २०२५-२६**

ई-निविदेद्वारे निविदा सूचना क्र. २१ व २२ अन्वये बांधकाम विभाग जिल्हा परिषद, पालघर यांच्या अधिनिस्त कामे http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग, मुख्या.जव्हार
जिल्हा परिषद, पालघर

सही/-
अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पालघर

02 TO 08 FEBRUARY 2026 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 1/31/2026 8:40 PM Page 1



# दादा गेले आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या घडाळ्याचे पुढे काय?

राजकारणातल्या निष्ठा या अलवावरच्या पाण्याच्या थेंबासारख्या असतात. त्यामुळे त्या कायमस्वापी टिकून राहत नाहीत. अजित पवार हे उत्तम संघटक होते. त्यांनी कार्यकर्त्यांची एक मजबूत फळी तयार केली होती. त्यांची पक्षावर मजबूत पकड होती त्यामुळेच शरद पवारांच्या विरोधात जाऊन स्वतःचा पक्ष स्थापन केल्यानंतरही राष्ट्रवादीचे काही प्रमुख नेते आणि कार्यकर्ते त्यांच्या सोबत राहिले आणि याच कार्यकर्त्यांच्या ताकदीवर त्यांनी लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत घवघवीत यश मिळवले. पण दुर्दैवाने त्यांना अर्ध्या आयुष्यातून जावे लागले. त्यामुळे त्यांच्या पक्षाचे काय होणार? कारण दुसऱ्याच्या पक्षावर घारी सारखी नजर ठेवून असलेले भाजपवाले आता अजितदादांच्या राष्ट्रवादीचे लचके तोडल्याशिवाय राहणार नाहीत. अजित दादांवर त्यांचा पक्ष समर्थपणे सांभाळण्याची पार्थ किंवा जय या दादांच्या दोन्ही मुलांमध्ये टाकत नाही. पण केवळ महायुतीला सहानुभूती मिळावी म्हणून दादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रिपदी बसवून आम्ही दादांच्या कुटुंबासोबतच आहोत आणि दादांचा राष्ट्रवादी कायमस्वरूपी आमच्या सोबत राहील हे दाखवण्याचा भाजपने प्रयत्न केला आहे. सुनेत्रा पवार या उच्च शिक्षित आहेत.शिवाय माहेर पासून त्यांना राजकीय घराण्याचा वारसा आहे. त्यामुळे त्यांना राजकारण समजते. पण समोर भाजपा सारखा कुटिल कारस्थानी पक्ष आहे. त्यांच्या शह काटशहाच्या राजकारणापुढे सुनेत्रांचा टिकाव लागणार नाही. कारण एव्हाना राष्ट्रवादीचे आमदार फोडण्याची कारस्थानी सुद्धा सुरू झालेली असतील. या सर्व पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीचे पुढे काय हाच खरा प्रश्न आहे. शरद पवारांचे वय झाले आहे. त्यामुळे दादांच्या पक्षातील लोक शरद पवारांकडे पुन्हा जातील असे वाटत नाही. या सर्व परिस्थितीत भाजपला अछेदिन येऊ शकतात. कारण भाजपच्या स्थानिक नेत्यांचा शिंदेसेनेशी वाद सुरू आहे अशावेळी दादांचे ४० पेक्षा अधिक आमदार जर भाजपासोबत गेले तर शिंदेंची अवस्था वाईट होईल. आणि तशी परिस्थिती सुद्धा आहे. कारण दादांच्या नंतर राष्ट्रवादीतील मोठे नेते म्हणून सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांच्याकडे पहिले जाते.पण ते दोघेही भाजपचे छुपे हस्तक आहेत. त्यामुळे दादांच्या पक्षाचे काय होणार? हाच याक्षणी खरा प्रश्न आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील 'पॉवर हाऊस' मानले जाणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाने राज्याचेच नाही, तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे भवितव्यही टांगणीला लागले आहे. आपल्या शब्दावर आमदार आणि कार्यकर्त्यांची फळी उभी करणारे नेते आज आपल्यात नाहीत, त्यामुळे पक्षाच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभा राहिला आहे. या संपूर्ण पेचप्रसंगात अजितदादांच्या पत्नी आणि राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाची धुरा सोपवली जाणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे. अजित पवारांच्या निधनानंतर पक्षात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी सुनेत्रा पवार यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे. सध्या राज्यसभा खासदार असलेल्या सुनेत्रा पवार यांनी बारामतीमध्ये सामाजिक आणि राजकीय पातळीवर मोठे काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची एकात्मता टिकवणे शक्य होईल, असे मत राजकीय विश्लेषक व्यक्त करतात. अजितदादांच्या निधनाने कार्यकर्त्यांमध्ये खच निर्माण झाला आहे. या खचलेल्या कार्यकर्त्यांना एकत्र ठेवण्यासाठी 'पवार कुटुंबातील' व्यक्तीनेच नेतृत्व करावे, असा मोठा प्रवाह पक्षात आहे. आगामी निवडणुकांमध्ये सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष भावनिक मुद्यावर मते मिळवू शकतो, असे राजकीय जाणकारांचे मत आहे. राजकीय समीकरणातील बदल अजित पवारांच्या निधनामुळे राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलू शकतात. शरद पवार यांनी व्यक्त केलेली हळहळ पाहता, राष्ट्रवादीचे दोन्ही गट आणि पुन्हा एकत्र येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सुनेत्रा पवार शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाचे विलीनीकरण किंवा समन्वय साधू शकतात, ज्यामुळे आपल्या मुलांचे (पार्थ आणि जय पवार) राजकीय भविष्य सुरक्षित राहू शकते. अजित पवारांच्या गटातील ४० हून अधिक आमदार आता कोणासोबत राहणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष टिकेल की राष्ट्रवादी पुन्हा एकत्र येईल, हे येणारा काळ ठरवेल. पक्षातील ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे आणि छगन भुजबळ हे सुनेत्रा वहिनींच्या पाठीशी उभे राहतील की नव्या संमेलनासाठी शरद पवारांच्या नेतृत्वाखाली एकच 'राष्ट्रवादी' घोषित होईल, हे राजकीय वर्तुळाचे पुढील नियोजन ठरवेल. राजकीय विश्लेषकांचे मत आहे की, अजित पवारांच्या अकाली निधनाने महाराष्ट्रातील राजकारणात नवा अध्याय सुरू होण्याची वेळ आली आहे, आणि आता पक्षाच्या भवितव्यासाठी सुनेत्रा पवार या वारसदार नेत्यांसमोर पक्षाला एकसंघ ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. हे आव्हान पेलण्यासाठी दादांवर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांची सुनेत्रा पवार यांना किती साथ मिळते यावरच सारे काही अवलंबून आहे. कारण प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर लोकांचा विश्वास नाही ते अगोदरपासुनच भाजपचे हितचिंतक आहे. केवळ दादांचा वचक आणि दरारा होता म्हणून ते अजित दादांच्या सोबत राहिले. त्यातच या दोन नेत्यांना पक्षातूनच विरोध आहे. त्यामुळे पटेल आणि तटकरे यांच्यावर सुनेत्रा पवार यांनी विश्वास ठेवू नये. उलट आपले कुटुंब आणि पक्षाचे सर्व सामान्य कार्यकर्ते यांच्यावर भरोसा ठेवूनच पक्षाला पुढे नेण्याचा प्रयत्न करावा तरच राष्ट्रवादीचे अस्तित्व टिकून राहील

# लेखा, कोषागारे : काल व आज

महाराष्ट्र शासनाने वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करून कोषागाराचे नियंत्रण संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडे विभागप्रमुख या नात्याने सोपविण्यात आले.१९६२ पूर्वी जिल्हा कोषागारे वित्त विभागाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली होती आणि शासन सचिव, वित्त विभाग हे जिल्हा कोषागारांचे विभागप्रमुख होते. यापूर्वी वित्त विभागाने १ एप्रिल १९५५ पासून जुन्या मुंबई राज्यातील कोषागारे महसूल विभागाकडून आपल्या नियंत्रणाखाली आणली. भुतपूर्व हैद्राबाद राज्यातील कोषागारे ही त्या शासनाच्या वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली होती व राज्य पुनर्रचनेनंतर, दिनांक १ नोव्हेंबर १९५६ पासून ती थेट मुंबई राज्याच्या वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली आली. तथापि विदर्भातील कोषागारे ही महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली होती. ती १ जानेवारी १९५८ पासून वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली घेण्यात आली. राज्यातील सर्व जिल्हा कोषागारे ही संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत शासनाच्या वित्त

विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणली. मात्र तहसीलच्या ठिकाणी असलेली उपकोषागारे महसूल विभागाच्या नियंत्रणाखाली होती. ही उपकोषागारे संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांच्यामार्फत वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यासाठी दिनांक १ एप्रिल १९६४ रोजी २४ उपकोषागारांचा एक गट व दिनांक १ जून १९६८ रोजी ९८ उपकोषागारांचा आणखी एक गट वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आणण्यात आला. आता राज्यातील सर्व २९० उपकोषागारे वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली आहेत. दि. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालयाची स्थापना करण्यात आल्यानंतर शासनाच्या व्यवहारासंबंधीच्या लेख्यांचे काम पाहणारी सर्व जिल्हा कोषागार कार्यालये. वित्त विभागाचे कोषागार निरीक्षण पथक, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई. संचालक, स्थानिक निधी लेखा, मुंबई यांचे कार्यालय. भांडार पडताळणी विभाग. लेखा कार्यालये (प्रशिक्षण), वित्त विभागातील दक्षता पथक शाखा इ. कार्यालये व संलग्नित शाखा या संचालनालयाच्या नियंत्रणाखाली आणल्या. अधिदान व लेखा कार्यालय मुंबई या कार्यालयाची मुख्यालयाचे प्रदानाचे काम पार पाडण्यासाठी दिनांक १ एप्रिल १९५५ रोजी स्थापना करण्यात आली. हे काम यापूर्वी महालेखापाल, मुंबई यांच्याकडून पार पाडण्यात येत होते. लेखा प्रशिक्षण कार्यालयाकडून कोषागार लिपिकांना आणि इतर विभागातील व कार्यालयातील लेखाविषयक कामकाज पार पाडणाऱ्या लिपिकांना प्रशिक्षणांची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

सध्या मुंबई, नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक,अमरावती येथे प्रशिक्षण वर्ग आहेत. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालय स्थापन झाल्यानंतर वित्त विभागास दुय्यम असलेल्या लेखा कार्यालयातील पर्यवेक्षकीय संवर्गाची पुनर्रचना वित्त विभागाखेरीज इतर शासकीय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील लेखाविषयक बाबीचे काम पाहणारी पदे विचारात घेऊन एकत्रित राज्यासाठी वित्त विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली शासनाने फेब्रुवारी १९६५ पासून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेची स्थापना केली. यामध्ये निरनिराळ्या शासकीय विभागांमधील लेखाविषयक कामे करणाऱ्या सर्व राजपत्रित व अराजपत्रित पर्यवेक्षी पदांचा समावेश करण्यात आला. यामुळे केवळ निरनिराळ्या शासकीय विभागांमध्येच नव्हे तर मंडळे, महामंडळे, प्रकल्प, विद्यापीठे, जिल्हा परिषदा, वाणिज्यिक विभाग, स्थानिक निधी लेखापरिक्षा कार्यालय इत्यादी मध्ये देखील लेखाविषयक व वित्तीय जबाबदारीची कामे करण्यासाठी पुरेशी अर्हता व अनुभव असलेले प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध होऊ शकतात. तसेच यामुळे कर्मचाऱ्याना सर्वांगीण अनुभव मिळण्याच्या दृष्टीने, त्यांची अदलाबदल करण्याची सोय उपलब्ध होते. १ फेब्रुवारी १९६५ रोजी या सेवेमध्ये एकूण ३७५ कर्मचारी होते. ही संख्या २५४० इतकी झालेली आहे. १ जानेवारी १९६२ पासून लेखा व कोषागारे संचालनालय स्थापन झाल्यानंतर पुणे व नागपूर येथे दोन प्रादेशिक कार्यालयेही स्थापन करण्यात आली. सन १९८० नंतर महसूल विभागाप्रमाणे प्रादेशिक कार्यालयाची पुनर्रचना करून अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोकण विभाग अशी चार प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्यात आली. उपसंचालक (सध्या सहसंचालक) लेखा व कोषागारे यांना प्रादेशिक विभागप्रमुख म्हणून घोषित करण्यात आले.

भांडार पडताळणी शाखा- लोकलेखा समितीने १९४४-४५ च्या विनियोजन लेख्यावरील लेखा अहवाल व केलेल्या शिफारशीनुसार शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक ९२८१/३३, दिनांक १६ ऑक्टोबर १९५२ अन्वये वित्त विभागाचा एक भाग म्हणून स्वतंत्र भांडार पडताळणी २ शाखेची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १ जानेवारी १९६२ पासून स्थापना करण्यात आलेल्या लेखा व कोषागारे संचालनालयाकडे वित्त विभागाची भांडार पडताळणी शाखा विलीन करण्यात आली. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक डीएटी-१०६४/५८४/सी-१२ दिनांक १ फेब्रुवारी १९६५ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा दिनांक १ फेब्रुवारी १९६५ स्थापन करण्यात आली आणि भांडार पडताळणी अधिकारी व भांडार निरीक्षक या पदांचा उक्त सेवेच्या अनुक्रम गट-ब व गट-ब (अराजपत्रित) मध्ये अंतर्भाव करण्यात आला. भांडार पडताळणी शाखेमार्फत शासनाच्या विविध विभागीय कार्यालयाच्या ताब्यातील साठ्यांची व भांडारांची पडताळणी केली जाते.

राज्य अभिलेख देखभाल अभिकरण-केंद्र शासनाने दिनांक ०१ एप्रिल २००४ पासून लागू केलेली नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना महाराष्ट्र राज्यात लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. या निर्णयास अनुसरुन दिनांक ०१ नोव्हेंबर,२००५ पासून सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक ३१ ऑक्टोंबर २००५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले. व्हर्चुअल ट्रेजरी - महाराष्ट्र शासनाच्या कर व करेत्तर रकमा 'इंटरनेट बँकिंग' सुविधेचा वापर करुन करदात्यांना इलेक्ट्रॉनिक पध्दतीने भरता याव्यात, यासाठी शासन वित्त विभागाने शासकीय जमा लेखांकन पद्धत (GRAS) ही प्रणाली विकसित केली आहे. बिम्स, बील पोर्टल, सेवार्थ या प्रणालीमधून संगणीकृत देयके तयार केली जातात. पारित झालेली देयकांची रक्कम EFT, NEFT व CMP व ई कुबेर व्दारे संबंधित आहरण व संवितरण अधिकारी आणि लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा केली जाते. तसेच निवृत्तीवेतनधारकाचे पुरवणी, मासिक निवृत्तीवेतन आणि निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरणाची रक्कम सुध्दा उचझ व ई कुबेर व्दारे सरळ त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येत आहे. SMS व्दारे निवृत्तीवेतन धारकांना प्रथम ओळखपत्रासाठी संदेश देणे, मासिक, पुरवणी निवृत्तीवेतन देयक कोषागारात जनरेट झाल्याबरोबर डचड जाणे, हयात प्रमाणपत्राची संगणात नोंद घेतल्यानंतर त्वरीत निवृत्तीवेतन धारकांना हयात प्रमाणपत्राची नोंद घेतल्याचा संदेश जाणे इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. कोषवहिनी, अर्थवाहिनी व्दारे जिल्हा निहाय जमा व खर्च, आहरण व संवितरण अधिकारी निहाय जमा व खर्च, लेखाशिर्ष निहाय जमा व खर्च, कोषागारात दाखल केलेल्या देयकाचा स्टेटस इ. अनेक प्रकारची अद्यावत माहिती मिळू शकते.

प्रशासन : संचालक लेखा व कोषागारे, हे कार्यालय, मुंबई येथे कार्यरत असून त्यांच्यासमवेत दोन सहसंचालक, दोन उपसंचालक, एक सहायक संचालक आणि एक रचना व कार्यपध्दती अधिकारी आहेत. अधिदान व लेखाधिकारी मुंबई, मुख्यलेखापरिक्षक, मुंबई हे सुध्दा संचालनालयाच्या अधिनस्त असून संचालक लेखा व कोषागारे मुंबई यांचे प्रशासकीय नियंत्रण आहे. महाराष्ट्रात एकूण ३४ जिल्हा कोषगारे आणि २९० उपकोषागारे कार्यालय आहेत. नियमित संचालकाव्यतिरिक्त २९ संचालक दर्जाचे, ५४ पदे सहसंचालक संवर्गातील, १२९ पदे गट-अ (वरिष्ठ) २९७ पदे ग-अ (कनिष्ठ), ९४८ पदे ब (राजपत्रित संवर्गातील आहेत. सर्वसाधारण जिल्ह्यात महाराष्ट्र वित्त व लेखा सवंर्गातील वेगवेगळया विभागात संवर्गातील अधिकारी- कर्मचाऱ्यांची किमान १०० पदे कार्यरत असतात.

**- ॲड.अण्णाराव भुसणे,**
**सेवानिवृत्त कोषागार अधिकारी**

# सत्तेसाठी चाललेले थैमान, लोकशाहीची क्रूरथट्टा!

सत्तेतून पैसा व पैशातून सत्ता. हेच समीकरणे निवडणुकीचे काळात दिसत आहे. फुले- शाहू-आंबेडकरने भारतीय राज्यघटनेच्या व्यवस्थेला प्राधान्य दिले होते. परंतु घटनेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा पूर्णत्वात जाऊ नये, या विचाराने पछाडलेल्या काँग्रेसने डॉ. आंबेडकरांचा राजकीय दृष्ट्या पराभव केला, तसेच राज्य घटनेत मुळसंविधानाचा तालमेळ बिघडविलामुळे, कृषीप्रधान देशात शेतकरी आत्महत्या होणे ही या पराभवाचीच लक्षणे आहेत. आजची राज्य घटना जुन्या काँग्रेसमय विचारसरणीचे संविधान आहे. आणि त्यातही गरजेनुसार, काही चुकीचे धोरणे राबवून सत्ता चालवल्या गेलेली सरकारे आहेत. मूळ संविधान हे १८ जून १९५१ ला पहिली घटना दुरुस्ती करून बदलविण्यात आले व त्यानुसारच आतापर्यंत बीजेपी ने राजवट चालवली. (म्हणजेच या मूळ संविधानाचे घटना दुरुस्तीत उदा. समुद्रातील मंथना प्रमाणे जसे दुधातील ताक व तूप हे वेगळे होते.) तसेच घटनेतील मुळगाभा म्हणजेच दुधातील तूपच संपवण्याचा घाट, या काँग्रेस व भाजप दोन्ही राजकीय पक्षांनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवरच सामान्य लोकांची परिस्थिती गरीबी, दुरुस्ती झाली. आज २६ जानेवारी १९५० रोजीचे प्रजासत्ताक दिनी समर्पित केलेल्या डॉ. आंबेडकरांच्या मूळ संविधानाला जर खरे स्वरूप दिले आजही दिले गेले असते तर एवढा कलह माजला नसता, अनर्थ घडला नसता. संविधानाचे तुकडे करून देश चालविला गेला. उदा.- दुधाचे मंथन करून तूप, दही व तूप वेगळे केले जाते, आणि मंथन करून निघालेल्या नुसतं ताकावरच्या व्यवस्थेवर (संविधाना तील छोट्याश्या तुकड्यावर ) जर या देशाची एवढी प्रगती झाल्याची दिसत आहे.तर संविधानातील महत्वाचे टप्पे (दुधातील तूप )नष्ट करूनच शेतकरी- शेतमजूर मारला गेला, व देशाची अपरिमित हानी करण्यात आली . जर राज्यघटना मूळ संविधाना प्रमाणे (उदा. जर दूध एकत्र असल्याप्रमाणे संविधान) चालले असते तर आज भारत देशाची प्रगती दैदिप्यमान, व बलशाली राहिली असती. भारत देश एव्हढा कर्जबाजारी झाला नसता. दिवसें दिवस फुले - शाहू - आंबेडकर विचार हा दाबल्या जात असून लोकशाही संपुष्टात आणण्याचे प्रकार चालू झाले. हिंदू राष्ट्र निर्मितीवर भर देऊन सामाजिक जीवनातील व्यवस्था, धार्मिक तेढ वाढवून ती बदलण्याचा प्रकार भारत देशात सुरू झाला. त्यामुळे सामाजिक विषमता येवून नैतिकतेची मूल्य पायदळी तुडविल्या जात आहे. आणि हे मूल्य पायदळी तुडविण्याची सुरुवात काँग्रेसने केली आणि तीच बीजेपी सरकारने आजपर्यंत खतपाणी घालून अजून राबविली. त्यामुळे काँग्रेस व बीजेपी हे एकच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्ही राजकीय पक्ष ही लोकशाहीची क्रूर थट्टा करून, ती संपवण्यासाठी जबाबदार आहेत. म्हणूनच - काँग्रेस-बीजेपी हटाव, भारत देश बचाव, भारत देश का किसान बचाव, भारत देश की लोकशाही बचाओ, और लोकतंत्र बचाओ; राजकीय पक्षाच्या वाटचाली धोरणात्मक न वाटता, सत्तापिपासू असल्याचे दिसत आहेत. आर.एस.एस. व भाजपला संपूर्ण देश बदलण्यात यश आले तरी, काँग्रेसचे कारकिर्दीत ज्या मागील पन्नास वर्षात राजकीय व सामाजिक चुका झाल्या आहेत. त्या दुरुस्त करून पुन्हा नवीन प्रक्रियेने सत्तेची वाटचाल होईल असे समाज मनाला नक्कीच वाटत होते. त्यासाठी त्यांनी अनेकवेळा सरकारे बदलविली. परंतु कोणत्याही सरकारने मूळचूक दुरुस्त केली नाही. भाजपा सरकारची वाटचाल देश पातळीवर प्रगती कारक वाटते, काही खात्यांचे जाळे जरी त्यांचे मजबूत वाटत असले, तरी राज्यात व देशात राबवणारी व्यवस्था मात्र निश्चितच शंकास्पद आहे, यात जनतेला आता तीळ मात्र शंका राहिली नाही.

१) बॅलेट पेपरच्या निवडणुकी रद्द करून ईव्हीएम घोटाळे तयार करणे. २) महाराष्ट्राला कर्जबाजारी करून, सत्तेच्या दबावाने तोडफोड करून शासन तिजोरीच्या पैशाचा गैरवापर करणे, इतर बाहेरील पक्ष फोडून सत्तेत घेणे. ३) काँग्रेसने चालवलेली शेतकरी विरोधी धोरणे सतत पुन्हा तीच ती वापरून शेतकरी आत्महत्या घडविणे. ४) उदा. पंजाब - हरियाणा येथील शेतकरी दिल्लीकडे आगेकूच करताना, शेतकरी हिताचे धोरणे राबविण्यासाठी आंदोलनाद्वारे वाटचाल करीत असताना, केंद्र सरकारने शेतकऱ्यांना दिलेली क्रूर वागणूक, शेतकऱ्याचे झालेले बेहाल, भारतातील जनतेच्या नजरेत आजही खूपत आहे. त्या आंदोलनात गेलेले शेतकऱ्यांचे जीव हा एक भाजपा सरकारला लागलेला मोठा कलंक आहे. ५) आमदार-खासदार यांना सत्तेतील पैसा वाटून गुलाम बनविणे आणि त्यांना वाटलेल्या पैशावर इडीचा धाक दाखवून आमदार- खासदारांनाच ताब्यात ठेवणे, जैलात, तुरुंगात पाठविण्याची धमकी देणे. ६) निवडणुकी घेण्यासाठी निवडणूक आयोगाला मनुष्य बळ वापरण्यासाठी शासनाची मदत घेऊनच, निवडणूक कार्यक्रम जाहीर करावे लागते. त्यामुळे सत्तेच्या लालचीसाठी आयोगाला राजकीय दृष्ट्या ताब्यात ठेवून निवडणुकीवर अंकुश ठेवणे असे गैरप्रकार घडत आहे. ७) कोर्टातील न्यायाधीशांना धमकावून स्वतःच्या बाजूने निकाल लावल्या जात असेल, असे गैरप्रकार जनतेच्या निश्चितच लक्षात आलेली आहे. ८) तिजोरीतील जनतेचा पैसा अधिकृतपणे राजरोसपणे वाटून निवडणुकी जिंकण्यासाठी मतदान मिळविणे. ९) शेतकऱ्यांना शेतीमालाचा हक्क न देता, अधिकार न्याय, मिळवून न देता, लाचारीत व गुलामीत ठेवून तिजोरीतील पैशावर शेतकरी - शेतमजुरांवर उपकार केल्याची भावना तयार करणे. १०) इंग्रजांच्या काळातील माफीवीर पंतप्रधान होणे, देश विरोधी कारवाया करून तडीपार नेत्यांना या देशाचा गृहमंत्री होणे, हा निश्चितच लोकशाहीचा गैरवापर होत आहे ११) सामाजिक न्यायव्यवस्था तोडून सत्तेत जाण्यासाठी जे जे शक्य असेल ते वाटेल ते करणे. परंतु हातची सत्ता जाऊ नये यासाठी सर्व जनतेला मूर्ख बनविणे. १२) भारतातील लोक किती अंधभक्त आहेत, हे धार्मिक प्रवृत्ती वापरून जनतेला बेवकूफ बनविले, जसे : गणपती दूध पिते . कोरोना काळात थाली व मेणबत्त्या लावून अंधश्रद्धा पसरविने. १३) सत्तेच्या बाजूने लढणाऱ्यांना क्रांतीकारक समाज हिताची माणसे हाऊस मध्ये निवडून न येऊ देता, गुंडेबाजाना सत्ता टिकविणेसाठी सतत प्रयत्न करण्यात आलेत. १४) पिढ्यान् पिढ्या धार्मिक वृत्तीची समाज मनावर पकड तयार करून सामाजिक व आर्थिक धोरनाचा गैरवापर करून, सतत सत्ता टिकविणे व यालाच राष्ट्रधर्म समजणे. १५) वारकरी, कीर्तनकार, गुरुदेव सेवक यांचा धार्मिक प्रवृत्तीसाठी लालच दाखवून गैरवापर करून घेणे चालू झाले. १६) विकासाच्या नावावर नगर विकास मंत्रालयाच्या मार्फत शहरी विकास करून, ग्रामीण भाग मातीत घालण्याचे कटूकारस्थान सतत दिवसेंदिवस वाढत राहिले. तर ही धोरणे सर्व लोकशाही विरोधी आहेत. १७) शेतकऱ्यांना सोयाबीनचे भाव परवडत नसल्यामुळे उत्पादन खर्च निघत नाही म्हणून निवडणुकी काळात विधानसभा प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रात येऊन आमचे सरकार आले तर शेतकऱ्यांना सोयाबीनला सहा हजार रुपये भाव देऊ, अशी ग्वाही दिली होती. १८) सत्तेत आलो तर आम्ही त्वरीत कर्जमाफी तू करू ही सर्व आश्वासने शेतकऱ्यांना फसवणुकीची वाटत आहे.१९) तुमच्या नैसर्गिक संकटात उपयोगी न पडता , ती आर्थिक मदत मात्र योग्य वेळी देऊ असे जरी भाजप सरकार म्हणत असेल, तरी ते निवडणूक जिंकण्याच्या उद्देशानेच पैसा वाटप करतील व पुन्हा निवडणूक जिंकतील. २२) जन सुरक्षा विधेयकाच्या नावावर सामाजिक नेत्यांचा चळवळीतील जनतेचा, चळवळीतील कार्यकर्त्यांचा नेत्यांचा आवाज दाबून ठेवणे. २३) डॉ.आंबेडकरांनी छोटे राज्य व्हावे अशी इच्छा व्यक्त केली असताना, भाजपा सरकारने विदर्भ प्रदेश व इतर छोटे राज्य आम्हाला मंजूर आहेत हे मान्य केले असले तरी, जनतेला बेवकूफ बनून ती राज्य योग्य वेळ आल्याशिवाय देणार नाहीत.

हीच परंपरा आता इतरही राजकीय पक्ष चालवीत आहेत. मतदारांनी योग्यवेळेची दखल न घेतल्यास त्याचे परिणाम संपूर्ण देशातील लोकांना भोगावे लागतील. ज्यां आंदोलकांनी शेतकऱ्याचे न्याय, हक्क व अधिकारासाठी उठाव केलेत, तेव्हा शेतकरी नेते जास्तीत जास्त संख्येनी हाऊस मध्ये मतदारांनी निवडून पाठविली नाही. त्यामुळे शेतकरी विरोधी कायदे, आर्थिक धोरणे बदलली नाही. त्याचे परिणाम सुध्दा पुढे जनतेलाच , मतदारांना भोगावे लागेल. ज्यांचा शेतकरी प्रश्नावर अभ्यास होता,ती मंडळी जनतेनी घरी बसविली व इतर वेगळीच मंडळी सत्तेत पाठविली, याला तर जनताच दोषी आहे. कारण सरकार हेच जनतेच्या मतावर चालते. महाराष्ट्र हा फुले ,शाहू ,आंबेडकर तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्री संत गाडगेबाबा, डॉ.पंजाबराव देशमुख, संत गुलाबराव महाराज, साने गुरुजी, कर्मवीर भाऊराव पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील, माधवराव खंडेराव मोरे नाशिक, स्व. शरद जोशी यांच्या कर्मभूमीचा व पुरोगामी विचारसरणीचा हा देश आहे.

काही राजकीय पक्षांनी पुरोगामी विचाराचा नायनाट करून, धर्माच्या नावावर चुकीचे नवरराष्ट्र तयार करण्याच्या पद्धतीला सुरवात केली. त्यावर आता जनतेलाच लगाम लावावा लागेल. डॉ. आंबेडकरांचे आर्थिक धोरणाला मूठ माती देण्याचे काम चालू असल्याचे दिसत आहे. आता संविधानावर फक्त डॉ.आंबेडकरांचा फक्त फोटो शिल्लक राहिला, मात्र त्याची विचारधारा मातीत घालण्याचे छडयंत्र चालू झाले. मूळ संविधानाची पूर्ण चिरफाड केली. तसेच शिवाजी महाराजांचे नाव घेऊन शिवाजी महाराजांचा फोटो छापून हिंदू धर्मात, व इतर जातीच्या विरुद्ध द्वेष निर्माण करून, लोकशाही विरोधी कृती आता सरकारची समाजाला दिसत आहे. हिंदूचीच फसवणूक करून हिंदू-मुस्लिम सत्ता स्थापन केल्या जात आहे. जर या क्रांतीतून जनता पुन्हा उफाळून आली तर पुन्हा या देशात हल्ले वाढतील .आंधळी दडते व कुत्र पीठ खाते लोकशाही विरोधी धोरणे वापरून सत्ता चालणार, हा मूर्खपणाचा कळस चालू ठेवला तर निश्चितच याचे परिणाम जनतेलाच भोगावे लागतील. कारण महाराष्ट्र हा संत परंपरेतील,ऋषी व कृषीचा एका सामाजिक दृष्टिकोनातून पुरोगामी विचारसरणी चा देश आहे, याचा पुनर्विचार करावा लागेल.

**- धनंजय पाटील काकडे (ज्येष्ठ साहित्यिक)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# अंबुलगा गटात काँग्रेस उमेदवारांना विजयी करण्याचा मतदारांचा संकल्प



**लातूर : वार्ताहर**

लातूरसह राज्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ चा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. या निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय पक्षांच्या कॉर्नर बैठका आणि जाहीर सभांनी वातावरण ढवळून निघाले आहे. लातूरमध्ये काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांनी प्रचारात मोठी आघाडी घेतल्याचे चित्र असून, सभांना मिळणारा मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हेच सिद्ध करत आहे. निलंगा तालुक्यातील अंबुलगा (बु) येथे काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य जाहीर सभा पार पडली. राज्याचे माजी मंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि स्वातीताई शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली. यावेळी अंबुलगा (बु) जिल्हा परिषद गटाचे उमेदवार श्री. पंकज शेळके, पंचायत समिती गणाचे उमेदवार हिरालाल माणिक कांबळे आणि केळगाव पंचायत समिती गणाच्या उमेदवार सौ. उषाबाई राजकुमार सोमवंशी यांच्या प्रचाराचा शुभारंभ श्रीफळ वाढवून करण्यात आला. या सभेला संबोधित करताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी आहे. त्यांचे विचार जिवंत ठेवण्यासाठी ही केवळ निवडणूक नाही, तर आपल्या आदरणीय नेत्यांच्या विचारांची आणि लातूरच्या अस्मितेची लढाई आहे. भाजपचे नेते विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसून टाकण्याच्या गप्पा मारतात, पण त्यांना आठवणी नाही तर विचारांचा खून करायचा आहे, जे कधीही शक्य होणार नाही. भाजपने शेतकरी, महिला किंवा तरुणांचे कोणतेही कल्याण केले नाही. याउलट लातूर जिल्हा मध्यवर्ती बँक आणि मांजरा परिवाराने शून्य टक्के व्याजदराने कर्ज आणि उच्च शिक्षणासाठी मदत करून जिल्ह्याला प्रगतीपथावर नेले. तांबाळा येथील काँग्रेस उमेदवार अंजली चौधरी यांचा अर्ज पोलीस बंदोबस्तात मागे घ्यायला लावणे, ही शुद्ध दादागिरी आहे. हे लोक लातूरचा बिहार करू पाहत आहेत. असे सांगून विरोधक आता रेल्वे आणण्याच्या भूलथापा देत आहेत. रेल्वे कोच फॅक्टरीसाठी आम्ही जमीन दिली, पण स्थानिक तरुणांना अद्याप रोजगार मिळाला नाही. भाजपला फक्त फेकफेकी चांगली जमते. असे सांगीतले. आज प्रशासकीय राजवटीत प्रत्येक कामासाठी पैशांचे वजन ठेवावे लागते. भ्रष्टाचारमुक्त आणि स्वच्छ कारभारासाठी काँग्रेस आघाडीला बहुमताने विजयी करा. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष अशोकराव पाटील निलंगेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, गेल्या ९ वर्षांतील प्रशासकीय कारभारात सर्वसामान्यांना मोठा त्रास सहन करावा लागला आहे. आता न्यायालयाच्या आदेशामुळे निवडणुका होत असून, परिस्थिती बदलण्याची हीच खरी संधी आहे. लातूर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभय साळुंके यांनी भाजपवर टीका करताना म्हटले, महागाई, बेरोजगारी आणि शेतमालाला नसलेला भाव यामुळे जनता त्रस्त आहे. सुवर्णसंधी आली आहे, मतदारांनी भाजपला त्यांची जागा दाखवून द्यावी आणि लातूर जिल्हा परिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकवावा. या सभेत चक्रधर शेळके, पंकज शेळके आणि शिवाजीभाऊ शिंदे यांनीही आपली मनोगते व्यक्त केली. या जाहीर सभेला ॲड. समद पटेल, हमीद शेख, सुभाष शिंदे, जगदीश सगर, डॉ.अरविंद भातांबरे, विजयकुमार पाटील, किशोर कारखाने, राखीताई शेळके, महेश देशमुख, विठ्ठल पाटील, दिनकर बिराजदार, बालाजी गोमसाळे, राजकुमार पाटील, अजित नाईकवाडे, सुधीर लखणगावे, दिलीप ढोबळे, महावीर काकडे, अजगर अन्सारी, मयूर तेलंग, अभय शर्मा यांच्यासह अंबुलगा (बु) आणि केळगाव गटातील नागरिक, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात तब्बल १७ कृषी केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द!

**लातूर : वार्ताहर**

रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये शेतकऱ्यांना वेळेत बियाणे, खत आणि कीटकनाशकांचा पुरवठा होण्यासाठी कृषी विभागाने कडक पावले उचलली आहेत. पुणे येथील संचालक (नियंत्रण व गुणनियंत्रण) कृषी आयुक्तालयाच्या सूचनेनुसार लातूर जिल्ह्यात भरारी पथक आणि कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) यांनी कृषी निविष्ठा केंद्रांची तपासणी केली होती. तपासणीदरम्यान काही केंद्रांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्याने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांच्या अध्यक्षतेखाली ८ जानेवारी २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली. या सुनावणीत एकूण १७ परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले.

या मध्ये बियाणे विक्रीचे १३, खत विक्रीचे २ आणि कीटकनाशक विक्रीचे २ परवाने रद्द झाले आहेत.तसेच ८ कृषी निविष्ठा केंद्रांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. साठाफलक व भावफलक प्रदर्शित न करणे, साठा नोंदवही आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, भावफलक, साठा नोंद अद्ययावत न ठेवणे, विक्री बिलावर शेतकऱ्यांची सही, अंगठा न घेणे, बियाण्यांचा संपूर्ण तपशील बिलात न लिहिणे, उत्पादकाचा स्त्रोत न दर्शविणे, ई-पॉस वरील खत साठा आणि प्रत्यक्ष साठ्यात तफावत, खतासोबत इतर निविष्ठांची लिंकिंग करणे, परवाना असूनही दुकान बंद ठेवल्यास बियाणे अधिनियम १९६६, नियम १९६८, बियाणे नियंत्रण आदेश १९८३, खत नियंत्रण आदेश १९८५, कीटकनाशक कायदा १९६८ आणि कीटकनाशक नियम १९७१ नुसार कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भास्कर कोळेकर यांनी स्पष्ट केले.

## जुचंद्र सेवा मंडळातर्फे विद्यार्थ्यांसाठी बेंच व आश्रम शालेस इन्वर्टर भेट




**वसई : वार्ताहर**

स्वातंत्र्य सैनिक मोरेश्वर नारायण पाटील विद्यालय मालजीपाडा येथील विद्यार्थ्यांना शाळेत मोडकलीस आलेल्या बेंचवर बसून लिहिताना त्रास होत होता. सदरहू गैरसोय लक्षात घेऊन शिव छत्रपती समाज सेवा मंडळ जुचंद्र चे संस्थापक पुरुषोत्तम पाटील यांनी रामलाल बगाडिया चारिटेबल ट्रस्ट मुंबई यांच्याशी संपर्क साधून ३० नवीन बेंचेस उपलब्ध करून दिले. सदरहू बेंचेसचे समारंभपूर्वक वितरण बगाडिया ट्रस्टचे सेवक अनिल सिंग यांच्या हस्ते करून सर्व विद्यार्थ्यांना केळी, पेन, बिस्किट वाटप करण्यात आले. कार्यक्रमास संस्थापक पुरुषोत्तम पाटील, मिलिंद पाटील, धर्माजी म्हात्रे उपस्थित होते. मुख्याध्यापिका ज्योत्स्ना पाटील यांनी पाहुण्यांचे स्वागत करून आभार मानले. तसेच विक्रमगड तालुक्यातील आश्रम शाळा माण येथील वस्तीगृहात राहणाऱ्या २५० विद्यार्थीनीसाठी रात्रीच्या वेळी लाईट गेल्यावर अंधारात राहणाऱ्या विद्यार्थीनीसाठी इन्वर्टर बसून त्यांची गैरसोय दूर केली. सदर इन्वर्टर फ्रेंड सर्कल मुंबईचे उद्योजक सुबोधजी गुप्ता व रामस्वरूप गाडोदिया यांच्या आर्थिक सहकार्याने लावण्यात आले. इन्व्हर्टरचे उद्घाटन मुख्याध्यापक माळीसर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमास मंडळाचे सदस्य किशोर पाटील व अजय गाडवे उपस्थित होते.

## सामूहिक कवायत संचलन कार्यक्रम संपन्न

**पालघर : वार्ताहर**

प्रजासत्ताक दिनानिमित्त पालघर जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सामूहिक कवायत संचलन हा कार्यक्रम नियोजित पद्धतीने राबविण्यात आला. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांचा सहभाग होता. या कार्यक्रमाचा जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम आर्यन हायस्कूल, पालघर येथील क्रीडांगणावर आयोजित करण्यात आला. यामध्ये एकूण १७१० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला, तसेच १०० शिक्षकांनी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत सहभाग घेतला. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इजाज अहमद शरीक मसलत, जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक अशोक पाटील, शिक्षणाधिकारी प्राथमिक सोनाली मातेकर, शिक्षणाधिकारी योजना शेषराव बडे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) व्यंकटराव हुंडेकर उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून अशा उपक्रमांचे शैक्षणिक व सामाजिक महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमास संबंधित संस्थेचे पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवृंद तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## चिखुर्डा येथे भाजपाच्या प्रचार फेरीस मतदारांचा मोठा प्रतिसाद



**लातूर : वार्ताहर**

लातूर तालुक्यातील काटगाव जिल्हा परिषद गटातील चिखुर्डा येथे भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराच्या निमित्ताने संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत काढण्यात आलेल्या प्रचार फेरीस मतदारांनी प्रचंड प्रतिसाद दिला यात महिलांचा सहभाग मोठा दिसून येत होता. भाजपाचे नेते आमदार रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील भारतीय जनता पार्टीचे काटगाव जिल्हा परिषद मतदार संघातील उमेदवार सौ. पूर्वादेवी नागसिंह देशमुख आणि गातेगाव पंचायत समिती गणातील उमेदवार श्री. समाधान जगन्नाथ पवार यांच्या प्रचाराच्या निमित्ताने मौजे चिखुर्डा येथे भाजपा महिला आघाडीच्या सौ. संजीवनीताई रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत गावातून प्रचार फेरी काढण्यात आली. हनुमान मंदिरात श्रीफळ फोडून काढण्यात आलेल्या या प्रचार फेरीस मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यात महिलांचा मोठा सहभाग दिसून आला घरोघरी भेटी देऊन प्रचार पत्रक वाटप करण्यात आले. यावेळी सौ. संजीवनीताई कराड यांच्या समवेत उमेदवार सौ. पूर्वादेवी देशमुख यांच्यासह भाजपाचे ज्येष्ठ मार्गदर्शक नाथसिंह देशमुख, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, शंकर चव्हाण, केदार देशपांडे, ज्ञानेश्र्वर जुगल, भागवत कदम, सुरेश सूर्यवंशी, दशरथ बनसोडे, संतोष जगताप, अशोक पाटील त्याचबरोबर सौ. उर्मिला जुगल, सौ. उज्वला जुगल, सौ. सोनाली माळकरी, सत्यजित कदम, सचिन घाडगे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मतदार महिला पुरुष मोठ्या संख्येने प्रचार फेरीत सहभागी झाले होते.

## विक्रमगड येथे ५१ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा



**विक्रमगड : वार्ताहर**

शिव छत्रपती समाज सेवा मंडळाचे संस्थापक पुरुषोत्तम पाटील यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त मंडळाच्या वतीने ५१ जोडप्यांचा सामुदायिक विवाह सोहळा रविवार दि.२५ जानेवारी रोजी दुपारी १२.३० वाजता हिंदू वैदिक पद्धतीने प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा माण, विक्रमगड येथे संपन्न होणार आहे. परमपूज्य बालयोगी श्री सदानंद महाराज यांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोहिदास पाटील (संस्थापक शंकर नारायण महाविद्यालय भाईंदर), बाळाराम पाटील (अध्यक्ष रयत शिक्षण संस्था रायगड विभाग), निलेश सांबरे (अध्यक्ष आदिवासी सेवा मंडळ मुंबई), राजेशभाई त्रिवेदी (अध्यक्ष मैत्री फाऊंडेशन), विजयशेठ पाटील (उद्योजक व माजी सभापती जि.प.ठाणे), प्रदीप मारोतराव खैरकर (उपाध्यक्ष आदिवासी सेवा मंडळ), गुरुनाथ भोईर (अध्यक्ष बालयोगी श्री सदानंद महाराज आश्रम), महेश नाईक (सचिव आदिवासी सेवा मंडळ), यशवंत वातास सर (अध्यक्ष आदिवासी शैक्षणिक सेवा), रमेश माळी (मुख्याध्यापक आश्रम शाळा माण, विक्रमगड) तसेच शिव छत्रपती समाज सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच पुरुषोत्तम पाटील आदी उपस्थित राहणार आहेत.

## भावनादेवी सांवरे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर



**वाडा : वार्ताहर**

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने भावनादेवी भगवान सांवरे यांच्या वाढदिवसानिमित्त वाडा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. बुधवारी (दि.२८जाने.) सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत जिजाऊ जनसंपर्क कार्यालय, वाडा येथे हे शिबिर उत्साहात पार पडले. या रक्तदान शिबिरास सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती, महिला तसेच परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. रक्तदान हे श्रेष्ठदान असून त्यातून अनेक गरजू रुग्णांचे प्राण वाचू शकतात, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. रक्तदात्यांचे मार्गदर्शन व वैद्यकीय तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत करण्यात आली. सर्व रक्तदात्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी हेमांगीताई पाटील, संचिता पाटील, महेंद्र ठाकरे, सुजय जाधव, राम जाधव आदी उपस्थित होते. आयोजकांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून समाजोपयोगी उपक्रमांमुळे सामाजिक बांधिलकी जपली जात असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# वाडा येथील नॅशनल आर्चरी स्पर्धेत लिटिल एंजल्स स्कूलचे घवघवीत यश



**वाडा : वार्ताहर**

लिटिल एंजल इंग्लिश मीडियम स्कूल, वाडा येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर आपल्या शाळेचे आणि महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले आहे. दि. २२ ते २६ जानेवारी या कालावधीत अलिबाग (जि. रायगड) येथे पार पडलेल्या राष्ट्रीय फील्ड आर्चरी चॅम्पियनशिप स्पर्धेत भारतातील सर्व राज्यांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत लिटिल एंजल इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्ण व रौप्य पदकांवर आपले नाव कोरले. १७ वर्षाखालील मुले बेअरबो - लाकडी प्रकारात सोहम छाबिदास चरसकर याने वैयक्तिक सुवर्णपदक पटकावले. संघ स्पर्धेत सोहम चरसकर, वीर संजय पाटील आणि तनिष्क संदीप गणोरे यांनी सुवर्णपदक जिंकले. तसेच १४ वर्षाखालील मुली संघ प्रकारात पलक जनार्दन पाटील, देवश्री अक्षय भोईर आणि याद्रिका अतुल तारे यांनी रौप्यपदक मिळवून शाळेच्या यशात भर घातली. स्पर्धेत प्रत्येक संघाला ४ मिनिटांत ५ बाण सोडण्यासाठी १२ टोकांच्या तीन फेऱ्या देण्यात आल्या. सर्व फेऱ्यांच्या सरासरी गुणांवर निकाल ठरविण्यात आला. प्रचंड थंडी, तणावपूर्ण वातावरण असूनही विद्यार्थ्यांनी अचूक लक्ष्यभेद साधत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या यशामागे विद्यार्थ्यांचा जवळपास एक वर्षाचा सातत्यपूर्ण सराव असून शाळेचे आर्चरी कोच शैलेश भन्साली सर यांनी शाळा वेळेत व त्यानंतर नियमित सराव घेत मोलाचे मार्गदर्शन केले. शाळेचे चेअरमन देवेंद्र भानुशाली, मुख्याध्यापिका सुमन मैनी तसेच शिक्षक मेघन ठाकरे, संदीप पवार, आदेश सर व योगी सर यांचेही मोलाचे सहकार्य विद्यार्थ्यांना लाभले. थंडीशी झुंज देत, शेकोटीच्या उबेतून घडलेले हे यश आज राष्ट्रीय पातळीवर झळकले आहे. लिटिल एंजल इंग्लिश मीडियम स्कूलच्या या नेमबाज विद्यार्थ्यांनी भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताचे नाव उज्ज्वल करावे, अशा शुभेच्छा सर्वत्र व्यक्त होत आहेत.

## थोडक्यात वृत्तांत




### वसईत हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न

वसई : विश्वजित मित्र मंडळ, वसई हे विविध सामाजिक व महिलांसाठी कार्यक्रम राबवित असते. सालाबादाप्रमाणे यंदाही विश्वजित मित्र मंडळाने सोमवार दि. २६/०१/२०२६ रोजी राम मंदिर, आयझॅक न्यूटन शाळेसमोर, रमेदी, वसई (प) येथे सायंकाळी ५.०० ते ७.०० यावेळेत महीलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित केला होता. सुमारे २२५ महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. महीलांना हळदी-कुंकू लावुन व वाण देऊन कार्यक्रमास सुरवात केली, आयोजित केलेल्या हळदी-कुंकू कार्यक्रमास परिसरातील महिलांनी उत्तम प्रतिसाद दिला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.प्रितम प्रशांत मडकईकर, सौ.मोमीता संजय कायल, सौ.श्रिया संकेत वेर्लेकर, कु.मिली मलय मैईती, कु.हतिका प्रशांत मडकईकर यांनी विशेष मेहनत घेतली.

### ४ फेब्रुवारीला जिल्हा नियोजन समितीची बैठक

पालघर : वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जिल्हा नियोजन समितीचे अध्यक्ष गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक दिनांक ०४/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता लोकशाहिर आत्माराम पाटील, जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आयोजित करण्यात आली आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन स्थगित

लातूर : प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. परंतु, सद्यस्थितीत लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समित्यांची सार्वत्रिक निवडणूक २०२६च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहितेची अंमलबजवणी सुरु असल्यामुळे ०२ फेब्रुवारी २०२६ रोजीचा लोकशाही दिन स्थगित करण्यात आला असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

### ७५ महिलांच्या प्रवाशांसाठी मोफत धावल्या!



ठाणे : २७ जानेवारी २०२६ धर्मवीर आनंद दिघे साहेबांच्या ७५व्या जयंती निमित्त ७५ महिलांनी आपल्या ७५ 'गुलाबी ई-रिक्षाने लहान मुलानं पासून ७५ वर्षावरील नागरिकांना मोफत प्रवास सेवा देऊन वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा केला. आज सकाळी १० वाजता ७५ महिला गुलाबी युनिफॉर्म घालून ७५ 'गुलाबी ई-रिक्षा' सोबत सकाळी १० वा शासकीय विश्राम गृह कोर्ट नाका ठाणे येथे उपस्थित होत्या. मिलींद बल्लाळ, राजन साप्ते आदी मान्यवरांच्या हस्ते भगवा झेंडा फडकवून मोफत सेवेचे उदघाट्न करण्यात आले. वाट न बघता आज रिक्षा मिळाली, आज कोणी रिक्षा ने नाही म्हटले नाही, प्रवास सुखकर झाला. अश्या प्रतिक्रिया ठाणेकर नागरिकांनी दिल्या. धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या समाजसेवेच्या दृष्टीकोनाला आणि कार्याला दिलेली आदरांजली आहे. असे आयोजक जयदीप कोर्डे, डॉ. श्रीकांत राजे, संजय मिरगुडे, अविनाश पावळे यांनी म्हटले.

### तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा संपन्न



वाडा : तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेतील मोठा गट - वादविवाद प्रकारात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, देहर्जे या शाळेने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील कु. विधी राजेश माळी व कु. धनश्री किरण हाडळ यांनी प्रभावी सादरीकरण करून परीक्षकांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांना वर्गशिक्षक तथा मुख्याध्यापक आत्माराम हरड यांच्यासह संजय सांबरे, मनाली भोईर, विवेक वेखंडे, उदय खिरारी, ललिता भोये, संगीता गायकवाड व गौरी बोरसे या शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे, वादविवाद स्पर्धेत विक्रमगड तालुक्यात सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान जि. प. उच्च प्राथमिक शाळा, देहर्जे या शाळेने मिळवला आहे. या यशाबद्दल शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### ट्रक खाली सापडून दुचाकिस्वार जखमी



वाडा : हनुमान मंदिरा समोर झालेल्या अपघातात दुचाकी चालकाच्या अंगावरून मागचे टायर गेल्याने दुचाकी चालक गंभीर जखमी झाला होता तर त्याच्या सोबत असलेला दुसऱ्या प्रवाशांला ही किरकोळ दुखापत झाली असून दोघांना वाडा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. दुचाकी चालक साईनाथ सुरेश सालकर व जितेंद्र विठ्ठल लाखत हे दोघेही डाहे हून वाड्याच्या दिशेने येत असताना अचानक त्यांची दुचाकी घसरत समोरून येणाऱ्या ट्रकच्या मागच्या चाका खाली सापडले यात दुचाकी चालकाच्या अंगावरून ट्रकचे चाक जाऊन दुचाकी चालक गंभीर जखमी झाला होता तर सहप्रवासी किरकोळ जखमी झाला होता. दोघांवरही ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून दुचाकी चालकाला अधिक उपचारासाठी खाजगी रुग्णालयात हवण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे.

02 TO 08 FEBRUARY 2026 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 1/31/2026 8:41 PM Page 1



# मोटारसायकलला कट मारल्याचा बहाणा करून लुटमार करणाऱ्या टोळीला पर्दाफाश



**लातूर : प्रशांत मसके**

लातूर शहरात विना नंबर प्लेटची मोटरसायकल चालवत माझ्या मोटर सायकलला कट का मारलात, असे विनाकारण म्हणत हुज्जत घालून दहशत पसरवत तरुण, जेष्ठ नागरिक यांच्याकडे असलेले सोन्याची दागिने लुटणाऱ्या टोळीचा विवेकानंद चौक पोलिसांनी पर्दाफाश उत्कृष्ट कामगिरी केली. या कारवाईक पोलिसांनी एका आरोपीसह दोन विधी संघर्ष बालकांना ताब्यात घेतले आहे त्यांच्याकडून सुमारे ४ लाख ६६ हजार ५५० रुपयेचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की लातूर शहरात घडणाऱ्या जबरी चोरी व लुटमारीच्या घटनांना आळा घालण्यासाठी व गुन्हेगारांचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी विविध पोलीस ठाण्यात घडलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेऊन संबंधित प्रभारी अधिकारी व गुन्हे अन्वेषण पथकाला सूचना व मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने विवेकानंद चौक पोलीस स्टेशनच्या पथकाने अत्यंत तत्परता, कौशल्य व दक्षतेने कारवाई करून एका सराईत आरोपीस अटक केली असून त्याच्यासोबत असलेल्या दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत एकूण ४,६६,५५०/- किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून शहरात सक्रिय असलेल्या एका टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, लातूर हद्दीतील गरुड चौक, नांदेड रोड, लातूर येथे दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी एक इसम मोटारसायकलवरून जात असताना विना नंबर प्लेट असलेल्या स्प्लेंडर मोटारसायकलवरून आलेल्या तीन अज्ञात इसमांनी त्याच्या वाहनास मुद्दाम कट मारला. तुमच्यामुळे आमचा मोबाईल फुटला आहे. असा बनाव करून त्यांनी सदरील तरुणांची मोटरसायकल अडवली. त्यानंतर त्याला धमकावून, दहशत निर्माण करून त्याच्या हातातील अंदाजे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी जबरदस्तीने काढून घेतली व ते तिघेही आरोपी घटनास्थळावरून पळून गेले.या घटनेनंतर सदरील तरुणाने तात्काळ पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे येऊन घडलेली घटना सांगितली. त्यावरून पोलीस स्टेशन विवेकानंद चौक येथे गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन विवेकानंद पोलीस ठाण्याच्या पोलीसांनी त्वरित तपास सुरू केला.

घटनास्थळी मिळालेली माहिती, फिर्यादीने दिलेले वर्णन तसेच गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे शहरात नाकाबंदी करण्यात आली. दरम्यान, संशयास्पदरीत्या फिरणारी विना नंबर प्लेट स्प्लेंडर मोटारसायकल पोलिसांच्या निर्दशनास आली. सदर मोटारसायकल अडवून तिच्यावर असलेल्या तीन इसमांना ताब्यात घेण्यात आले. त्यांना विश्वासात घेऊन चौकशी केली असता मुख्य आरोपी नामे वसीम रज्जाक शेख, (वय २६ वर्षे, रा. सिंदगाव, ता. रेणापूर, जि. लातूर.) याने त्याच्यासोबतच्या दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांच्या मदतीने शहरातील विविध भागांत अशाच पद्धतीने जबरी चोरी व लुटमारीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, सदर आरोपी व टोळीविरुद्ध पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूरगुन्हे दाखल असून या सर्व गुन्ह्यांमध्ये आरोपींनी मोटारसायकलला कट मारणे, खोटा बहाणा करणे, नागरिकांना धमकावणे व त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने जबरदस्तीने हिसकावून घेणे अशीच पद्धत अवलंबिल्याचे स्पष्ट झाले आहे. सदर कारवाईत मुख्य आरोपी वसीम रज्जाक शेख यास अटक करण्यात आली असून दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याकडून वरील गुन्ह्यांतील गेला माल – एकूण ३४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटारसायकल असा एकूण ४ लाख ६६ हजार ५५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

मुख्य आरोपी वसीम रज्जाक शेख याच्यावर यापूर्वीही जबरी चोरी, लुटमार व तत्सम स्वरूपाचे गुन्हे दाखल असून तो सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येत असून पुढील तपास सुरू आहे. ही संपूर्ण उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन विवेकानंद चौक, चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.खोडेवाड, श्री. मुळे, पोलीस उपनिरीक्षक रेडेकर,सफौ. गुंडरे,पोलीस अंमलदार ,खुर्रम काझी, रविंद्र गोंदकर, यशपाल कांबळे, गणेश यादव, रणवीर देशमुख, धैर्यशील मुळे, सचिन राठोड, प्रेमानंद कांबळे, खंडू कोळी यांनी अत्यंत शिस्तबद्ध, धाडसी व कौशल्यपूर्ण कामगिरी बजावली आहे.

पान १ वरून....

## कर्जवसुलीसाठी दांडगाई करून ...

प्रमोद व त्याच्या साथीदारांना अटक केली आहे. सिध्दापुर तालुक्यातील कुडगुंडा येथे मंजुनाथ हसलर हे दोघे आपल्या कुंटूंबासमवेत राहयला आहेत. त्याची आर्थिक परिस्थीती ही सधन असल्याने पंचक्रोशीत त्यांना सावकार म्हणून ओळखले जाते. हे दोघे बंधु कोणाला ही आपल्याकडील पैसे मोठ्या व्याजाच्या रक्कमेने देत होते. त्यामुळे त्याची कुंडगुंडा गावात आणि परिसरातील गावात दशहत होती. अडल्या नडल्यांना जादा व्याजाने पैसे देवून हे दोघे ही भाऊ अनेकांचे शोषण करीत असत. हल्ली सावकारकी करणारे लोक त्याच्या मजबुरीचा फायदा उठवित त्यांना पैसे देवून व्याजाला आणि मुद्दलाला नडत असतात. आपण दिलेली रक्कम ते व्याजासह समोरच्या व्यक्तीकडून वसुल करीत असतात. गेल्या सहा सात महिन्यापूर्वी चंद्रशेखर हसलर यांनी गावातीलच प्रमोद नायक याला मोठी रक्कम व्याजाने दिलेली होती. तसे चंद्रशेखर हसलर आणि प्रमोद नायक हे जवळचे मित्र ही होते. त्यामुळे चंद्रशेखर यांनी प्रमोद नायक याला त्याच्या आर्थिक अडचणीच्या वेळी पैशाची मदत केली. परंतु मदत केलेल्या रक्कमेला त्यांनी व्याज ही जादा लावलेले होते. त्यातून अलिकडे प्रमोद नायक याची परिस्थिती ही ढासळत गेली असल्याने त्याचे कुठेच काही हात पाय चालत नव्हते.त्यातच चंद्रशेखर हसलर यांनी त्याच्याकडे आपण दिलेली रक्कम परत मागण्याचा तगादा लावलेला होता. त्यातून दोघांची वादावादी ही झालेली होती. या वादावादीत चंद्रशेखर हसलर यांनी त्याला मारहाण देखील केलेली होती. त्यामुळे प्रमोद नायक हा चंद्रशेखर याच्यावर चिडून होता. प्रमोद यांने चंद्रशेखर यांना काही कारणास्तव मी पैसे तुला या वेळी परत देवू शकत नाही आणखीन मला त्यासाठी मुदत दे अशी विंनती त्यांना केलेली होती.परंतु चंद्रशेखर यांना प्रमोद नायक याची सध्याची आर्थिक परिस्थीती लक्षात आलेली होती. प्रमोद हा आर्थिक कारणातून बेजार झालेला आहे. त्याच्यावर अनेकांचे कर्ज आहेत. त्यामुळे तो काही आपल्याला लवकर आपली रक्कम परत देणार नाही याची गॅरेंटी वाटल्याने त्यांनी त्याला तुझी प्रॉप्रटी मला लिहून दे असा तगादा त्याच्या मागे लावलेला होता. चंद्रशेखर हसलर हे आपली प्रॉप्रटी हडप करायला बसलेले आहेत हे प्रमोद नायक याच्या लक्षात आल्यावर त्यांनी चंद्रशेखर यांना मी तुझी रक्कम परत देवू शकत नाही, तुला काय करायचे ते कर असे सांगितले. त्यातून ही दोघांची सारखी भांडणे होत होती. चंद्रशेखर हसलर यांनी आपल्या माणसाकरवी प्रमोद नायक याला एका ठिकाणी कोंडून घालून त्याला चांगलाच चोप दिला होता. माझी घेतलेली रक्कम मला परत दे. माझी रक्कम बुडविण्याची भाषा करू नकोस त्याचे परिणाम वाईट आणि गंभीर होतील असे त्यांनी त्याला बजावले होते. त्यातच त्यांनी त्याला मारहाण करीत असताना मला माझे पैसे कसे वसुल करायचे ते मला चांगले माहित आहे. घरात तुझी बायको देखणी आहे तिला माझ्याकडे पाठवून दे अशी मागणी त्यांनी प्रमोद याला धमकी देत त्याच्याकडे केली. त्यावेळी प्रमोद नायक याने कसे तरी करून त्याच्या तावडीतून आपली सुटका करून घेतली. चंद्रशेखर हसलर यांनी आपल्या पत्नी विषयी अपशब्द वापरल्याची खंत प्रमोद नायक यांना होती. आता याला चांगलाच धडा शिकवायचा असा विचार त्याने केला. त्यासाठी त्यांनी आपल्या नात्यातील सन्या नायक आणि हेमंत नायक याची मदत घेण्याचे ठरविले. चंद्रशेखर यांनी आपल्या इज्जतीवर घाला घालण्याचा प्रयत्न केल्याचे प्रमोद नायक याने हेमंत नायक आणि सन्या नायक यांना सांगितले. या तिघांनी मिळून आता एक डाव रचला. प्रमोद नायक याने बुधवार दि.६ जानेवारी २०२६ रोजी चंद्रशेखर हसलर यांना फोन करून सांगितले की, मी तुमचे पैसे परत देतो या असे सांगितले. त्यावेळी दुपारी ३ वाजणेच्या सुमारास चंद्रशेखर यांनी आपला भाऊ मंजुनाथ हसलर याला सोबत घेतले आणि प्रमोदने बोलविलेल्या ठिकाणी गेले. प्रमोद नायक यांनी त्या दोघांना ही कुंडगुंडा गावापासून लांब होन्नवार येथील एका निर्जन स्थळी बोलाविले होते. त्या ठिकाणी हसलर बंधु पोहचताच प्रमोद याने आपण अगोदर दारू घेऊ असा आग्रह त्याच्याकडे धरला. नाही होय म्हणत चंद्रशेखर आणि मंजुनाथ हे दोघे ही दारू पिण्यासाठी तयार झाले. त्यावेळी तेथे अगोदरच सान्या नायक आणि हेमंत नायक ही होते.दारूची पार्टी जोरात करून मग आपण आपल्यातील वैरवाद मिटवूया नंतर मी तुम्हाला तुमची रक्कम देतो असे प्रमोद याने त्या दोघांना सांगितले. प्रमोद, सान्या आणि हेमंत यांनी अगोदरच एक मोठा प्लॅन त्यााना मारण्यासाठी केला होता. चंद्रशेखर आणि मंजुनाथ यांना मारण्यासाठी त्यांना देणार असलेल्या दारूत त्यांनी विष मिसळले होते.त्यामुळे दारू पिताच चंद्रशेखर आणि मंजुनाथ यांना रक्ताच्या उलट्या होवू लागले. त्या दोघांच्या डोळ्यावर एक प्रकारची धुंदी आली होती. त्यांना समोरचे काहीच दिसत नव्हते. याचा संधीचा फायदा घेत प्रमोद, सान्या आणि हेमत यांनी त्या दोघांना जबर मारहाण केली. माझ्या बायकोकडे वाकडया नजरेने बघतो काय म्हणत त्या दोघांच्या ही डोक्यात प्रमोद याने दगड घालण्याचा प्रयत्न ही केला. परंतु त्यांनी केलेल्या मारहाणीत चंद्रशेखर आणि मंजुनाथ हे आधीच बेशुध्द झाले असल्याने त्यांना त्याचा अवस्थेत त्या तिघांनी कारमध्ये बसविले. त्यांनी कार कुंडगुंडा गावाकडे न नेता सुरली-मुरकी गावाच्या दिशेने नेली. चंद्रशेखर आणि मंजुनाथ यांना विषारी दारू पिल्याने रक्ताची उलटी झाल्याने कारमध्येच त्यांचा मृत्यु झाला. आता याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची म्हणून वाटेत सान्या आणि हेमंत नायक यांनी नायरा पेट्रोल पंपावरून एका रिकाम्या मोठया बाटलीतून पेट्रोल खरेदी केले.सुरळी मुरकी गावाच्या हद्दीतील एका नाल्यात त्यांनी ती कार ढकलून देत त्या कारवर पेट्रोल टाकून काडी पेटीने पेटवून दिले. कारवर पेट्रोल टाकून पेटविल्याने गाडीत असलेले चंद्रशेखर हसलर आणि मंजुनाथ हसलर हे जळून खाक झाले.गाडी बरोबर ते दोघे ही जळालेले असल्याने प्रमोद नायक, सान्या नायक आणि हेमत नायक यांनी तेथून काढता पाय घेतला आणि एका मोटार सायकलीवरून निघून गेले. त्यावेळी रात्रीचे ९ वाजून गेले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सकाळी एका अज्ञात व्यक्तीने होन्नावर पोलीस स्टेशनला फोन करून सांगितले की, सुरळी, मुरकी रस्त्यालगत असणाऱ्या एका नाल्यात एक मारूती कार जळालेली असून त्यात दोन इसमाचे मृतदेह जळालेले आहेत. हि माहिती मिळताच पो.निरी. सिध्दरामेश्वरम यांनी आपल्या सहकार्यासह घटनास्थळी धाव घेत पाहणी केली.कारच्या आत मध्ये दोन इसमाचे मृतदेह जळालेले होते. त्याची ओळख पटविणे गरजचे असल्याने पोलीसांनी पंचनामा सुरू करून माहिती घेण्यास सुरूवात केली. कारच्या नंबर प्लेटवरून त्या कारचा मालकाचा शोध घेतला असता ही कार कुंडगुंडा गावातील चंद्रशेखर हसलर याची असल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीसांनी या घटनेची माहिती चंद्रशेखर हसलर याच्या कुंटुबियांनी दिली. त्याचे कुटुंब आणि नातेवाईक हे लागलीच या घटनेची माहिती मिळताच सुरळी मुरकी जवळील घटनास्थळी दाखल झाले. कारमधील दोन्ही मृतदेह हे चंद्रशेखर हसलर व त्याचा मोठा भाऊ मंजुनाथ हसलर याचे असल्याचे नातेवाईकांनी सांगितल्यावर पोलीसांनी पंचनामा उरकून या घटनेचा तपास चालू केला. प्रथम दर्शनी या कारचा रस्त्या कडेला अपघात झाला असल्याने ती कार नाल्यात पडून पेट घेतली असेल आणि त्यात चंद्रशेखर हसलर आणि मंजुनाथ हसलर याचा मृत्यु झाल्याचा अंदाज पोलीसांनी बांधून पंचनामा केला आणि दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी होन्नावर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिले. ही घटना अपघात नोंदवून पोलीस या घटनेचा तपास करीत असताना चंद्रशेखर हसलर आणि मंजुनाथ हसलर याचा मृत्यु हा अक्समात झाला अशी नोंद पोलीस स्टेशनच्या डायरीत केली. परंतु दोन चार दिवसांनी पोलसांना या दोन्ही मृतदेहाचा शवविच्छेदनाचा अवहाल मिळाला. त्यात दोघांचा ही मृत्यु हा अपघात नसून विषारी दारू पिल्याने झाला असल्याचा म्हटले होते. दोन्ही मयतांची माहिती पोलीसांनी नातेवाईकांकडून घेतली असता चंद्रशेखर आणि मंजुनाथ हे दारू पित होते परंतु ते चांगली दारू पित होते. असली विषारी घातक दारू ते कधीच पिणार नाहीत असे त्याच्या कुटूंबियाकडून पोलीसांना सांगण्यात आले. त्यातच हे दोघे ही व्याजाने पैसे देत असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी त्याच्या नातेवाईकाकाडून माहिती घेतली असता चंद्रशेखर यांनी प्रमोद नायक याला व्याजाने मोठी रक्कम दिलेली होती. त्यातून दोघांची भांडणे ही झाली असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी प्रमोद नायक याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले. त्याला पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे चंद्रशेखर याच्याकडे केलेल्या व्यवहाराची माहिती घेतली असता त्याने चंद्रशेखर हसलर याच्याकडून मी मोठी रक्कम घेतली असल्याचे कबुल केले. चंद्रशेखर हे त्यासाठी मला त्रास देत असल्याने आणि त्यांनी वेगळीच मागणी माझ्याकडे केली असल्याने मी चिडून जावून माझ्या नात्यातील मित्राकरवी त्यांना विषारी दारू पाजली आणि त्यात त्याचा मृत्यु झाला.त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायची म्हणून आम्ही त्यांची कार त्याच्यासह पेटवून दिली आणि पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला अशी कबुली दिली. प्रमोद नायक याने दिलेल्या माहिती वरून होन्नावर पोलिसांनी नंदीसाली गावातुन सान्या नायक आणि हेमंत नायक यांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपल्या गुन्हयाची कबुली दिली. या घटनेची फिर्याद मयत चंद्रशेखर हसलर याच्या जवळच्या नातेवाईकाकडून घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी चंद्रशेखर विरभद्र हसलर (४०) आणि त्याचा मोठा भाऊ मंजुनाथ विरभद्र हसलर (४३) रा.दोघे कुडगुंडा तालुका सिध्दापुर याच्या खून प्रकरणी प्रमाद नायक (३५) सान्या नायक (३०) हेमंत नायक (३०) याच्या विरोधात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला.पोलीसांनी या तिघांना ही कोर्टासमोर उभे केले असता कोर्टाने त्याची रवानगी जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल, दारूच्या रिकाम्या बाटल्या आणि विषाची बाटली जप्त केली. या घटनेचा पुढील तपास होन्नावर पोलीस स्टेशनचे पो.निरी.सिध्दरामेश्वरम याच्या मार्गदर्शनखाली करीत आहेत.

पान ८ वरून....

## वसई विरार महापालिकेत प्रजासत्ताक...

सेल्फी पॉईंट तयार करण्यात आले असून संपूर्ण महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी करण्यात आलेल्या तिरंगा थीम व रोषणाईने सर्व परिसर तिरंग्याने उजळून निघाला आहे. आयुक्त सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रजासत्ताक दिनानिमित्त प्रभागनिहाय विविध उद्यानांच्या ठिकाणी महापालिकेमार्फत शालेय विद्यार्थीवर्ग, शिक्षक व महिला बचत गटांच्या सहकार्याने देशभक्तीपर विविध सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्य, पथनाट्ये, भाषण, गायन इ. विविध सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमांना उपस्थित नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रभाग समिती डी अंतर्गत आचोळे तलाव येथे झालेल्या कार्यक्रमास आयुक्त सूर्यवंशी हे सपत्नीक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक केले. यावेळी हास्य जत्रा कलाकार अरुण कदम यांचीही विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या विनोदी शैलीत उपस्थित विद्यार्थी व उपस्थितांचे प्रबोधनपर मनोरंजन केले. या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थितांना संबोधताना आयुक्त यांनी, प्रजासत्ताक दिनी या सांस्कृतिक व प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यामागे देशभक्तीपर वातावरण निर्माण करण्याबरोबरच शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांना यानिमित्त आपले कलागुण सादर करता यावे व त्यांना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश आहे. विद्यार्थ्यांनी केलेली सादरीकरणे अतिशय कौतुकास्पद असून यात सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना महापालिकेमार्फत यासाठी प्रमाणपत्र दिली जातील व विशेष उल्लेखनीय सादरीकरण केलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कारही दिले जातील असे सांगितले. या कार्यक्रमाच्या आयोजनास सहकार्य लाभलेल्या शालेय शिक्षक वर्ग, महिला बचत गट, मनपा अधिकारी व कर्मचारी यांचे यावेळी आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी आभार मानले.

## 'प्रजासत्ताक दिना'च्या संचलनात...

राज्यांच्या श्रेणीतच नव्हे, तर इतर विभागांतही चुरस पाहायला मिळाली. यामध्ये सेना दलातून 'भारतीय नौदल' तर निमलष्करी दलातून 'दिल्ली पोलीस' यांच्या संचलन पथकाला सर्वोत्कृष्ट म्हणून गौरवण्यात आले. केंद्रीय मंत्रालयांच्या गटामध्ये सांस्कृतिक मंत्रालयाच्या चित्ररथाने बाजी मारली, तर केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग आणि 'वंदे मातरम' नृत्य समूहाला विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## उत्सुकता वसई-विरारच्या महापौर ...

चुरशीची ठरली. या महापालिका निवडणुकीत ११५ पैकी बहुजन विकास आघाडीने ७०, भाजपने ४३, कॉंग्रेस १, व शिवसेना (शिंदे गट) १ असे नगरसेवक निवडून आले आहे. निवडणुक निकालानंतर ३ फेब्रुवारी रोजी महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणुक होणार आहे. या निवडणुकीसाठी ३० जानेवारीला उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत होती. या दिवशी बहुजन विकास आघाडीकडून महापौर पदासाठी अजीव पाटील आणि प्रफुल्ल साने यांनी तर भाजपाकडून महापौर पदासाठी दर्शना त्रिपाठी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे . तर उपमहापौर पदासाठी बविआकडून मार्शल लोपीस, कन्हैया भोईर, तर भाजपाकडून नारायण मांजरेकर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. दोन्ही पक्षांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले असल्याने महापौर निवडीची चुरस अधिकच वाढली आहे. नुकताच पार पडलेल्या निवडणूकीत हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडीने स्पष्ट बहुमत मिळवत ७० जागा जिंकल्या आहे तर कॉंग्रेसची १ अशा एकूण ७१ नगरसेवक हे बविआकडे आहेत. तर भाजपकडे ४४ नगरसेवक आहेत त्यामुळे सद्यस्थितीत संख्याबळाच्या तुलनेत बविआ आघाडीवर असल्याचे चित्र दिसून येत आहे. बविआने निवडणूकीत एकहाती सत्ता मिळविली असल्याने महापौर व उपमहापौर पदासाठी अनेक नगरसेवक इच्छुक होते. महापौर साठी ७ तर उपमहापौर साठी १० जणांनी पक्षश्रेष्ठींकडे अर्ज दाखल केले होते. त्यानंतर झालेल्या बैठकीत महापौर पदासाठी दोन तर उपमहापौर पदासाठी दोन अशा चार उमेदवारांच्या नावावर शिक्कामोर्तब करून अर्ज सादर करण्यास सांगण्यात आले आहेत, असे माजी महापौर नारायण मानकर यांनी सांगितले. त्यामुळे अंतिम क्षणी या दोन्ही पदांवर कोणाची वर्णी लागणार, हे गुपित बविआने कायम ठेवले आहे.

## भिकल्या लाडक्या धिंडा यांना...

प्रामुख्याने आदिवासी वस्तीचे आणि संस्कृतीचे समृद्ध भाग. भिकल्या धिंडा यांचा जन्मही आदिवासी कुटुंबातील. वयाच्या बाराव्या वर्षांपासून त्यांनी तारपा वाजवायला सुरुवात केली. त्यांच्या घरात मागील १५० वर्षांपासून तारपा वादनाची परंपरा आहे. त्यांचे वडीलही तारपा वादक होते. त्यांना पाहतच त्यांनी ही कला आत्मसात केली. आजही अगदी नव्वदीतही ते न थकता तारपा वादनाचा आनंद घेताना दिसतात. आदिवासी संस्कृतीत तारपा हे देवाचे वाद्य मानले जाते. बांबू, माडाची पाती, मेण, सुकलेला दुधी आणि जिबल्या यांच्या साहाय्याने हे वाद्य तयार केले जाते. ते वाजविणाऱ्या व्यक्तीला 'तारपकर' असेही म्हटले जाते. देवकार्याला मुख्यत्वेकरून तारपा वादन करण्याची परंपरा आदिवासी समाजात आहे. यालाच 'चाळा' वाजविणे म्हणजे विविध आदिवासी देवतांच्या नावे करण्यात येणारे स्तवन किंवा स्तुती. तारपा वादनाद्वारे देवाचे आवाहन करण्यात येते आणि पीक चांगल येऊ दे, आमचे रक्षण कर, आम्हाला सुखी ठेव असे गाऱ्हाणे देवाला या तारपा वादनातून घातले जाते. वारली चित्रांमध्येही तारपा वाद्य वाजविणारे वादक आणि त्याभोवती फेर धरून नाचणारे आदिवासी बांधव दिसतात. 'या वाद्यात श्वास भरला की वाद्य आणि मी एकरूप होतो, असे भिकल्या धिंडा आपल्या तारपा वादनाविषयी सांगतात. लाल विटांच्या त्यांच्या घरात विविध आकाराची आणि रंगांची तारपा वाद्ये दिसतात. तारपा वाजविणे ही केवळ कला नाही तर ती फार मोठी जबाबदारी आहे असेही धिंडा मानतात. त्यांना जाहीर झालेल्या पद्मश्री पुरस्कारामुळे त्यांच्या आदीवासी समाजासह पालघर जिल्ह्यातही आनंद व्यक्त केला जात आहे. तारपा कलेचाही सन्मान झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

## १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा...

त्याचपमाणे, सेवा वितरणासाठी व्हॉट्सॲपचा वापर करून अंतर्गत समन्वय अधिक बळकट करण्यात आला आहे. याशिवाय परिक्षेत्रातील अर्ज चौकशीच्या कामकाजासाठी 'संवेदना' ही AI आधारित संगणकीय कार्यप्रणाली विकसित करण्यात आली असून त्याचा प्रभावीपणे वापर सुरु करण्यात आला आहे. सदर प्रणालीव्दारे अर्ज चौकशी पुर्ण केलेल्या प्रकरणांच्या अनुषंगाने तक्रारदारास सदर तक्रारीवर मत मांडण्यासाठी ऋशशवलरलज्ञ सुविधा देण्यात आली असून पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयात Feedback सेल देखील सुरु करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, नांदेड परिक्षेत्रातातील गुन्हयांच्या तपासावर देखरेख ठेवण्यासाठी Eagle Eye : Crime Investigation monitoring ही प्रणालीसुध्दा सुरु करण्यात आली असून उपरोक्त बाबींसोबतच नांदेड परिक्षेत्रातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांच्या निर्मूलनासाठी हेल्पलाइन 'खबर' ची सुरुवात करण्यात आली आहे. ९१ ५० १०० १०० असा सदर हेल्पलाइनचा क्रमांक आहे. सदर हेल्पलाइनवर नागरिकांना त्यांच्या भागातील गैरप्रकार व अवैध व्यवसायांची माहिती सुलभपणे देणे सोईस्कर झाले आहे. सदर हेल्पलाईन क्रमांकावर व्हॉटस्प सेवा कार्यान्वित करण्यात आली असून, नागरीकांनी केलेल्या तक्रारींवर पोलीसांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील सदर क्रमांकावरुन त्यांना देण्यात येते. पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयाने केलेल्या उपरोक्त कामकाजाची भारतीय गुणवत्ता परिषदेने दखल घेतली आहे. १५० दिवसांच्या सदर कार्यक्रमाची मुदत दिनांक १० जानेवारी, २०२६ रोजी पूर्ण झाल्यानंतर परीक्षेत्रीय कार्यालयांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन प्रथमतः पोलीस महासंचालक कार्यालयाकडून करण्यात येऊन, त्यातून (४) परिक्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक, उपमहानिरीक्षक कार्यालयांची निवड करण्यात आली होती. यात, नांदेड परिक्षेत्रीय कार्यालयाची देखील निवड करण्यात आली होती. त्यानंतर परिक्षेत्र कार्यालयांच्या कामगिरीचे अंतिम मूल्यमापन भारतीय गुणवत्ता परिषद (Quality Council of India) यांनी केले होते. दि. २६ जानेवारी, २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी महाराष्ट्र शासनाने यासंबंधीचा निकाल घोषित केला असून, त्यामध्ये राज्यातील सर्व पोलीस परिक्षेत्रांतून प्रथम क्रमांकाचा मान नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयास प्राप्त झाला आहे. परिक्षेत्र कार्यालयातील पोलीस अधिकारी, अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांच्या सोबतच Rythmbytes कंपनीचे सॉफटवेअर इंजिनिअर हर्षानंद शर्मा, SETTribe कंपनीचे संचालक सारंग वाकोडीकर व सॉफटवेअर इंजिनिअर शहेबाज खान यांनी अहोरात्र घेतलेल्या परिश्रमामुळेच हे यश शक्य झाले असून या यशामध्ये नांदेड परिक्षेत्रातील प्रत्येक अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा आहे, असे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी स्पष्ट केले आहे.

## भुपेश कडुलकर यांचा सहाय्यक...

सदर परिसरातील अन्य कोणीही व्यक्ती क्लोरीन गॅसच्या विषारी वायुने बाधीत होणार नाही याकरीता दक्ष नागरीक म्हणुन मोलाचे सहकार्य दिलेले होते. भुपेश कडुलकर यांनी सामाजिक कार्य व बहुमुल्य योगदानाबद्दल सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे वसई विभाग यांच्याकडून 'प्रशंसापत्र' देऊन गौरविण्यात आले आहे. भविष्यातही असेच समाजउपयोगी योगदान लाभेल याची आम्हांस खात्री आहे, असेही सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे यांनी सांगितले.

## दलोंडे जिल्हा परिषद शाळेला ...

लिमिटेडने पालघर जिल्ह्यातील जहार येथील निलेश एल. मुर्डेश्वर श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्याच्या शाळेत आयोजित आविष्कार २०२६ या वार्षिक सांस्कृतिक संमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे प्रायोजन केले. ही शाळा प्रगती प्रतिष्ठान या संस्थेद्वारे संचालित आहे. या कार्यक्रमामुळे श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे आपली कला सादर करण्यासाठी एक उत्साही व्यासपीठ मिळाले, ज्यातून त्यांची सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि जिद्द प्रकर्षाने दिसून आली. विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी पारितोषिक वितरण समारंभाचाही आयोजन करण्यात आले.

### ठाकरे बंधूंविरोधात आक्षेपार्ह व्हिडीओमुळे वादंग

# नालासोपाऱ्यात मनसे कार्यकर्त्यांची तरुणाची धिंड काढून बेदम मारहाण



**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा परिसरात समाजमाध्यमांवरील एका आक्षेपार्ह व्हीडिओमुळे मोठा वाद निर्माण झाला आहे. एका तरुणाने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याविरोधात अपमानास्पद व अर्वाच्च भाषेत वक्तव्य केले होते. या व्यक्तव्याचा व्हिडिओ तयार करून त्याने तो सोशल मीडियावर पोस्ट केला होता. प्रसिद्धी आणि 'व्ह्यूज'मिळवण्यासाठी केलेल्या या कृतीमुळे त्याच्यावर ठाकरे बंधूंविरोधात आक्षेपार्ह व्हिडीओमुळे तीव्र टीका होत आहे. हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्यानंतर आणि केवळ प्रसिद्धीसाठी ही मर्यादा ओलांडली जात असल्याचे लक्षात आल्यानंतर मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. मनसे पदाधिकारी किरण नकाशे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी संबंधित तरुणाचा शोध घेत त्याला थेट त्याच्या राहत्या घरातून बाहेर काढले. त्यानंतर त्याला मारहाण करत त्याची अर्धनग्न अवस्थेत धिंड काढण्यात आली. सूरज शिर्के असे या तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर सूरज शिर्केने हात जोडून ठाकरे बंधूंची माफी मागितली. तरुणाच्या या कृतींमुळे राजकीय वर्तुळात आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप दिसून येत होता. सध्या सोशल मीडियावर प्रसिद्धीसाठी कोणत्याही थराला जाऊन वादग्रस्त वक्तव्ये करण्याचे प्रमाण वाढले आहे. राजकीय नेत्यांवर टीका करताना सभ्यतेच्या आणि कायदेशीर मर्यादणकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे या घटनेतून दिसून येते. संबंधित तरुणाने केलेली पोस्ट अनेकांना आक्षेपार्ह वाटली असून त्यातूनच हा तणावपूर्ण प्रकार घडल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणावर मनसेच्या अधिकृत 'मनसे रीपोर्ट' या ट्विटर (एक्स) हँडलवरुन प्रतिक्रिया देण्यात आली आहे. या ट्विटमध्ये केवळ व्ह्यूज मिळवण्यासाठी खालच्या पातळीवर जाऊन शिवीगाळ व टीका करणाऱ्या व्यक्तीविरोधात कार्यकर्त्यांनी कारवाई केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. एका मर्यादेपर्यंत टीका सहन केली जाऊ शकते, मात्र सातत्याने अपमानास्पद वक्तव्ये केल्यास त्याचे परिणाम भोगावे लागतात, असेही या ट्विटमध्ये नमूद आहे.

## अंजुरफाटा चिंचोटी महामार्गावरील खड्डे व धुळीने नागरिक हैराण



**भिवंडी : वार्ताहर**

मानकोली अंजुर फाटा ते चिंचोटी या महामार्गाची सध्या प्रचंड दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले असून खड्ड्यातून उडणाऱ्या धुळीनेही आता प्रवासी हैराण झाले आहेत. रस्त्याच्या दुरावस्तेकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे पुरता दुर्लक्ष झाले आहे. मानकोली अंजुरफाटा चिंचोटी या रस्त्यावर नेहमी अवजड वाहनांची ये-जा असते त्यामुळे या अवजड वाहनांच्या मागे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून रस्त्यावर मोठमोठाले खड्डे व धुळीमुळे या रस्त्यावरून प्रवास करताना दुचाकीस्वारांना प्रचंड त्रास होत आहे. या रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी शासनाकडून निधी देखील मंजूर करण्यात आली असून ठेकेदाराने काम संथ गतीने सुरु केले आहे.विशेष म्हणजे ज्या ठिकाणी रस्ता चांगला होता त्याच ठिकाणी ठेकेदाराने काँक्रेट कामाची सुरुवात केली असल्याने चांगला रस्ता खोदून ठेवला आहे. त्यामुळे बाजूच्या खड्डेमय रस्त्यावर प्रवास करतांना नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्या च्या कामाकडे विशेष लक्ष द्यावे व ठेकेदाराने रस्ता काँक्रीट करतांना बाजूचा खड्डेमय रस्ता आधी दुरुस्त करावा त्यानंतरच दुसऱ्या बाजूने काँक्रेटीकरण सुरु करावे अशी मागणी ग्राम पंचायत वडघरचे माजी सदस्य अँड.नितीन पंडित यांनी केली आहे.

## वाड्यातील शास्त्रीनगर भागात गटारीच्या स्लॅबला भगदाड; अपघाताचा धोका



**वाडा : वार्ताहर**

वाडा नगरपंचायत प्रशासनाने शास्त्रीनगर भागात नागरिकांच्या आरोग्यासाठी उभारलेली ओपन जिम सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या परिसरात करण्यात आलेल्या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासोबत बांधण्यात आलेल्या गटारीवरील काँक्रीट स्लॅब निघून गेल्याने लोखंडी सळ्या उघड्या पडल्या असून मोठे भगदाड तयार झाले आहे. त्यामुळे येथे कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच परिसरात नगरपंचायतीकडून उभारण्यात आलेल्या ओपन जिममध्ये दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, लहान मुले, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक ये-जा करतात. अनेक विद्यार्थी रोज या गटारीवरूनच मार्गक्रमण करतात. मात्र सध्या गटारीची अत्यंत धोकादायक अवस्था झाल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. विशेष म्हणजे काही महिन्यांपूर्वीच या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी व गटार बांधकामासाठी शासनाकडून मोठा निधी खर्च करण्यात आला होता. तरीही अल्पावधीतच गटारीची अशी दुरवस्था झाल्याने कामाच्या दर्जाबाबत नागरिकांकडून संशय व्यक्त केला जात आहे. एवढा निधी खर्च करूनही गटार शेवटच्या घटका मोजत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. तसेच ओपन जिमच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात चारचाकी वाहनांचे पार्किंग केले जात असल्याने नागरिकांना ये-जा करताना अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे ही ओपन जिम नागरिकांच्या आरोग्यासाठी आहे की वाहन पार्किंगसाठी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. रात्रीच्या वेळी परिसरात पुरेशी प्रकाशव्यवस्था नसल्याने अंधारात हे भगदाड न दिसल्यास मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. एखादा विद्यार्थी, लहान मूल किंवा ज्येष्ठ नागरिक जर या भगदाडात पडला, तर मोठा अनर्थ होऊ शकतो, अशी संतप्त प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांमध्ये उमटत आहे.

या पार्श्वभूमीवर निवडून आलेल्या नगरसेवकांनी तसेच वाडा नगरपंचायत प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष द्यावे, गटारीचे भगदाड त्वरित बुजवावे, मजबूत व सुरक्षित स्लॅब बसवावेत, ओपन जिम परिसरात साफसफाई करावी तसेच वाहन पार्किंगबाबत स्पष्ट नियोजन करावे, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## वर्तक महाविद्यालयात विज्ञान, शिक्षण आणि सामाजिक बदल या विषयावर संवाद कार्यक्रम



**वसई : वार्ताहर**

वसई येथील अण्णासाहेब वर्तक महाविद्यालयात 'संवाद' या विशेष उपक्रमांतर्गत विज्ञान, शिक्षण आणि सामाजिक बदल या विषयावर विचारमंथनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात विज्ञान संवादक, शिक्षिका आणि सामाजिक उपक्रमकर्त्या रुचिरा सावंत या संवादक म्हणून सहभागी होणार आहेत. त्या ReyNova या शैक्षणिक उपक्रमाच्या संस्थापक असून World Economic Forum - Global Shapers च्या सक्रिय सदस्य आहेत. विज्ञान, सर्जनशीलता, समस्या-निराकरण आणि सामाजिक जाणीव यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यावर त्यांचा भर असून त्यांनी विविध उपक्रम, व्याख्याने आणि लेखनाद्वारे लाखो विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान सोप्या व प्रेरणादायी पद्धतीने पोहोचवले आहे. या कार्यक्रमात विज्ञान संवादाचे महत्त्व, शिक्षणाचा बदलता प्रवास, विद्यार्थ्यांसाठी निर्माण होणाऱ्या नव्या संधी तसेच समाजघडणीत युवकांची भूमिका यावर सुसंवाद साधला जाणार आहे. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध लेखिका वीणाताई गवाणकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. सदर कार्यक्रम शनिवार दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता, अण्णासाहेब वर्तक महाविद्यालय, वसई रोड पश्चिम येथील अध्यापक कक्षात होणार असून तो सर्वांसाठी खुला आहे. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वर्तक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद उबाळे यांनी केले आहे.

## उल्हासनगरमध्ये महापौर व उपमाहापौर पदासाठी झाली महायुती



**उल्हासनगर : सुनिल तांबे**

स्वबळावर लढलेले शिवसेना भाजप महापौर पदासाठी एकत्र झाली महायुती उल्हासनगर महापालिका निवडणुकीत स्वबळावर लढलेले भाजपा-शिवसेना शिंदे गट अखेर महापौर पदाच्या निवडणुकीत एकत्र. नुकतीच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका पारपडल्या आहे. शिवसेना शिंदे गट, टिओके, साईपक्ष, वंचित बहुजन आघाडी, पीपल्स रिपब्लिकन पार्टी, मनसे, उभाठा, आरपीआय, भाजप, कांग्रेस, राष्ट्रवादी, साई पक्ष व अपक्ष अशी निवडणूक रंगली होती. २० प्रभागासाठी ७८ नगरसेवक असता भाजपा पक्ष्याचे ३७ नगरसेवक स्वतंत्र निवडून आलेत. व शिवसेना शिंदे गटबंधन ३८ नगरसेवक निवडून आलेत. तर वंचित २, कांग्रेस १, शिंदे शिवसेना गटबंदन मोठाभाऊ ठरला. महापौर व उपमहापौर पदासाठी चुरस लागली होति. शिवसेना, भाजप, वंचित, साई पक्ष आणि अपक्ष अशी महायुती झाली आहे. या महायुतीकडून अश्विनी निकम यांनी महापौर पदासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. उल्हासनगर महापालिकेचा महापौर पद हे ओबीसी प्रवर्गासाठी राखीव झाल आहे,त्यानुसार शिवसेना शिंदे गटाकडून टीम ओमी कलानी अश्विनी निकम यांनी महापौर पदाचा उमेदवार अर्ज दाखल केला, तर तर महायुतीतील भाजपाकडून उपमहापौर पदासाठी अमर लुंड यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार बालाजी किनिकर, आमदार कुमार आयलानी, पूर्व आमदार पप्पू कालानी, शिवसेना कल्याण जिला प्रमुख गोपाल लांडगे, गटनेता अरुण आशान आणि अनेक नगरसेवक उपस्थित होते.

## अंजली भारती विरोधात भिवंडीत भाजपा महिलांकडून गुन्हा दाखल करण्याचे निवेदन



**भिवंडी : वार्ताहर**

भंडारा येथील सार्वजनिक कार्यक्रमात अंजली भारती यांनी आपल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्या बाबतीत आक्षेपार्ह विधान केले. त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. भाजपा भिवंडी शहर महिला अध्यक्षा कल्पना शर्मा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने निजामपूर पोलिस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक विश्वास डगळे यांना निवेदन देत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. या शिष्टमंडळात माजी महिला अध्यक्षा सुनीता टावरे, महिला पदाधिकारी सत्वशील जाधव, रेखा पाटील, विभा पाटील, मानसी राजे, यशवंती बिलवा, वैशाली पाटील, अक्षता मोईली आदी सहभागी झाल्या होत्या. अंजली भारती यांनी आपल्या अश्लाघ्य विधानाने अमृता फडणवीस यांचाच नव्हे तर समस्त महिला वर्गाचा अपमान केला असून त्याचा आम्ही महिला म्हणून निषेध करीत असून तिच्या विरोधात गुन्हा नोंद करून तिला शासन करावे अशी मागणी आमची आहे अशी माहिती महिला अध्यक्षा कल्पना शर्मा यांनी दिली आहे.

## जिल्ह्यातील कॉपीमुक्त अभियानाबाबत जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक संपन्न



**पालघर : वार्ताहर**

कॉपीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे आज जिल्हास्तरीय दक्षता समितीची बैठक पार पडली. सदर बैठक जिल्हाधिकारी तथा दक्षता समितीच्या अध्यक्ष मा. डॉ. इंदुराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग (योजना), डायटचे प्राचार्य तसेच दक्षता समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संवेदनशील परीक्षा केंद्रांवर महसूल विभागामार्फत भरारी पथके नेमण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या पथकांद्वारे अचानक तपासण्या करून गैरप्रकारांवर नियंत्रण ठेवण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी स्पष्ट केले की, सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून जबाबदारीने काम करावे. परीक्षा केंद्रांवरील पर्यवेक्षण, सुरक्षा व्यवस्था व अहवाल सादरीकरणाबाबत ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करण्यात यावे. कॉपीमुक्त परीक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने देखरेख ठेवण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार अतिरिक्त उपाययोजना तात्काळ राबविण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनीही कॉपीमुक्त अभियानाबाबत आपली भूमिका स्पष्ट करत सांगितले की, शिक्षण विभागाशी संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी परीक्षा काळात नियोजित जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडाव्यात. परीक्षा प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. तसेच कॉपीमुक्त अभियान यशस्वी होण्यासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. बैठकीत कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी प्रशासन, महसूल व शिक्षण विभागामधील समन्वय अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला.

## आदर्श शाळा व आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण



**वाडा : वार्ताहर**

ग्रामपंचायत अबिटघरच्या सरपंच साक्षी साठे यांच्या संकल्पनेतून आकारास आलेल्या आदर्श शाळा आणि आदर्श शिक्षक पुरस्काराचे भारताच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनाच्या शुभदिनी वाडा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वैभव शिंदे व वाडा पंचायतीचे गटशिक्षणाधिकारी उमेश सातपुते यांच्या शुभहस्ते तसेच सरपंच साक्षी साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या जल्लोषात वितरित करण्यात आले. त्याच बरोबर अबिटघर ग्रामपंचायतीच्या कार्यालयाचे ध्वजारोहण जेष्ठ कर्मचारी जनार्दन पाटील यांच्या हस्ते करून सरपंच महोदयांनी एक आदर्श घालून आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत हद्दीतील सहा शाळांचे एकत्रित स्नेहसंमेलन जिल्हा परिषद उच्च प्रथमिक केंद्र शाळा अबिटघरच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात पार पडला. समाजाला अशा दिशादर्शक कार्यक्रमांची नितांत गरज असून गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी सरपंच साक्षी साठे व पूर्ण ग्रामपंचायत कार्यकारिणी यांचे कौतुक केले. या दिमाखदार कार्यक्रमासाठी उपसरपंच धनश्री पाटील, सदस्य भरत जाधव, सुप्रिया पाटील, स्मिता चिमडा, मनिषा मुकणे, कुलदीप पाटील, कल्याणी साठे, केंद्र प्रमुख घनश्याम कांबळे, विस्तार अधिकारी अरुण पन्हाळे, मुख्यध्यापिका सुरेखा काळे, तसेच सर्व सहकारी शाळांचे मुख्याध्यापक व सहकारी शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिव यांच्या सोबत हजारो ग्रामस्थ व विध्यार्थी उपस्थित होते.

## जुचंद्र येथील प्रा.निलेश गवळी यांचे रयत शिक्षण संस्थेच्या गुणवत्तेचा गौरव!



**वसई : वार्ताहर**

धाराशिव येथे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शासकीय राज्यस्तरीय शिक्षक, अधिकारी व कर्मचारी पीपीटी प्रेझेंटेशन स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व एस.पी. ज्युनियर कॉलेज, जुचंद्र येथील कनिष्ठ महाविद्यालय विभागप्रमुख प्रा. निलेश दत्तात्रय गवळी यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या स्पर्धकांमधून केवळ पहिल्या सर्वोत्तम १० (TOP 10) विजेत्यांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये प्रा. निलेश दत्तात्रय गवळी यांचा समावेश झाल्याने रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. त्यांच्या सादरीकरणात विषयाची सखोल मांडणी, नाविन्यपूर्ण विचारसरणी, तांत्रिक अचूकता आणि प्रभावी सादरीकरण कौशल्य यांचा उत्कृष्ट समन्वय दिसून आला. या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य विनय पाटील, रायगड विभागीय सल्लागार समितीचे सदस्य पुरुषोत्तम पाटील, प्राचार्य विलासराव जगताप, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षिका, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी प्रा. निलेश गवळी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

## कला-स्वाद महोत्सवातून उद्योजकतेचा जागर



**भिवंडी : वार्ताहर**

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नति मंडळाच्या बी. एन. एन. महाविद्यालयातील ग्रामीण विकास विभागाच्या वतीने कला-स्वाद महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांचे तसेच जीवनावश्यक साहित्याचे स्टॉल लावून विक्री केली. विद्यार्थ्यांना व्यावसायिक ज्ञान, उद्योजकतेचे धडे आणि प्रत्यक्ष व्यवहाराचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. महोत्सवाला कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे, युवा उद्योजक सचिन हंडीबाग, प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर, उपप्राचार्य डॉ. सुधीर निकम, डॉ. निनाद जाधव, रजिस्ट्रार नरेश शिरसाळे, डॉ. दिलीप काकवीपुरे, डॉ. मयुरेश देशपांडे, डॉ. राजू रूपवते, डॉ. बी टी पगारे, प्रा. प्रमोद शेवाळे, डॉ. गुलिस्ता अन्सारी, डॉ. सोनम मोरे आदी मान्यवरांनी भेट देऊन विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. कार्याध्यक्ष बाळकृष्ण काळे व प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळुंकर यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या. या महोत्सवात विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी नागरिक व विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. कला-स्वाद महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. हा महोत्सव साकार करण्यासाठी डॉ. निनाद जाधव, प्रा. विद्या कांबळे यांनी विशेष प्रयत्न केले.

02 TO 08 FEBRUARY 2026 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 1/31/2026 8:42 PM Page 1



# वसई विरार महापालिकेत प्रजासत्ताक दिन साजरा

## देशभक्तीपर विविध सांस्कृतिक आणि प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन



**विरार : वार्ताहर**

देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन वसई विरार महापालिकेमार्फत २६ जानेवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनी महानपालिका मुख्यालय तसेच सर्व प्रभाग समिती कार्यालयांमध्ये ध्वजारोहण करण्यात आले. महापालिका मुख्यालयाच्या ठिकाणी वसई विरार महापालिका आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांमार्फत राष्ट्रध्वजाला सलामी देऊन राष्ट्रगीत, राज्यगीत व ध्वजगीताचे गायन तसेच संविधान उद्देशिकेचे वाचनही करण्यात आले. महापालिका मुख्यालयात झालेल्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमास आमदार राजन नाईक, मा. आ. हितेंद्र ठाकूर, मा. आ. क्षितीज ठाकूर, मा. प्रथम महापौर राजीव पाटील, अति. आयुक्त संजय हेरवाडे, दिपक सावंत, नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका, मा. नगरसेवक व मा. नगरसेविका, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, पोलीस विभागातील कर्मचारी, शिक्षक व विद्यार्थी, पत्रकार, महापालिका अधिकारी व कर्मचारी, नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.) यांनी सर्वप्रथम वसई विरार महापालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदान करून अतिशय शांततापूर्ण व शिस्तबद्धरित्या हा लोकशाहीचा उत्सव साजरा केल्याबद्दल सर्व वसई विरार शहरातील नागरिकांचे आभार मानले. मुंबई महानगर क्षेत्रामधील महापालिकांमध्ये सर्वात जास्त मतदान वसई विरार महापालिकेत झाले. या निवडणुकीत निवडून आलेल्या नवनिर्वाचित नगरसेवक व मनपा प्रशासन मिळून महापालिकेतील नागरिकांना अतिशय चांगल्या सुविधा, नवनवीन प्रकल्प देतील व नवनिर्वाचित नगरसेवकांना प्रशासनाचे संपूर्ण सहकार्य राहील आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेचा सर्वांगीण विकास करण्यात येईल, असेही आयुक्त यांनी यावेळी सांगितले. क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे या श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या उक्तीचा उल्लेख करत आयुक्त यांनी प्रशासनामार्फत कृती करून दाखविण्याचा निर्धार व्यक्त करीत सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महापालिकेमार्फत प्रजासत्ताक दिनानिमित्त महापालिकेतील उद्याने, तलाव, मुख्य रस्ते, चौक, मनपा कार्यालये इ. ठिकाणी विद्युत रोषणाई, सुशोभिकरण व देशभक्तीपर सजावट, ...पान ६ वर

# पालघर जिल्हा परिषद येथे प्रजासत्ताक दिन साजरा




**पालघर : वार्ताहर**

जिल्हा परिषद पालघर यांच्या वतीने भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७वा वर्धापन दिन उत्साहात व सन्मानपूर्वक साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत मानवंदना स्वीकारली.या कार्यक्अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे, प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.) इजाज अहमद शरीकमसलत तसेच जिल्हा परिषदेचे सर्व विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यानंतर समता प्रतिष्ठान, नागपूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थिनींचा सन्मान करण्यात आला. या स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त केलेल्या कु. संचिता लोतडा (ज्ञानमाता मुलींचे वसतिगृह, उपलाट, ता.तलासरी) हिला प्रजासत्ताक दिनाच्या औचित्याने मनोज रानडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांच्या हस्ते प्रमाणपत्र व ३००० रु .चा धनादेश देऊन गौरविण्यात आले. यावेळी विजेत्या विद्यार्थिनीचे तसेच स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

# ‘प्रजासत्ताक दिना’च्या संचलनात महाराष्ट्राचा चित्ररथ देशात सर्वोत्कृष्ट




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या ७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतील कर्तव्यपथावर पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे सादरीकरण सर्वोत्कृष्ट ठरले आहे. यंदाच्या संचलनामध्ये राज्यांच्या चित्ररथांमध्ये महाराष्ट्राच्या चित्ररथाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. केंद्र सरकारकडून आज या निकालांची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, या गटात जम्मू-काश्मीर आणि केरळ या राज्यांनी अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावला आहे. यंदा महाराष्ट्राने ‘गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक’ या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला होता. या चित्ररथाच्या माध्यमातून महाराष्ट्राची समृद्ध लोकसंस्कृती, गणेशोत्सवाचा सामाजिक वारसा आणि त्यातून मिळणारा आर्थिक रोजगार व आत्मनिर्भरतेचा संदेश अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आला होता. चित्ररथावरील भव्य गणेशमूर्ती, पारंपरिक ढोल-ताशा पथक आणि लेझीम खेळणाऱ्या कलाकारांच्या उत्साहाने कर्तव्यपथ दुमदुमून गेला होता. याच प्रभावी सादरीकरणामुळे परीक्षकांनी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या गटातून महाराष्ट्राच्या चित्ररथाला सर्वोत्तम चित्ररथ म्हणून निवडले आहे. केवळ ...पान ६ वर

### बहुजन विकास आघाडी आणि भारतीय जनता पक्षाकडून अर्ज दाखल

# उत्सुकता वसई-विरारच्या महापौर आणि उपमहापौर पदाची!





**विरार : वार्ताहर**

वसई विरार महापालिका निवडणुकीनंतर आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते म्हणजेच महापौर आणि उपमहापौर पदाकडे. वसई- विरार शहर महानगरपालिकेत महापौर व उपमहापौर पदासाठी आज शुक्रवारी भारतीय जनता पार्टी आणि बहुजन विकास आघाडी या दोन्ही पक्षांच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. भारतीय जनता पार्टीकडून महापौर पदासाठी ऍड. दर्शना त्रिपाठी यांनी तर उपमहापौर पदासाठी नारायण मांजरेकर यांनी आपले उमेदवारी अर्ज भरले आहेत. तर बहुजन विकास आघाडीकडून महापौर पदासाठी अजीव पाटील, प्रफुल्ल साने आणि निषाद चोरघे यांनी तर उपमहापौर पदासाठी मार्शल लोपीस आणि कन्हैय्या (बेटा) भोईर यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. आमची रणनिती काय आहे, हे आम्ही ३ फेब्रुवारी रोजी दाखवू. आमच्याकडे ४४ नगरसेवक आहेत, आम्हाला फक्त १४ नगरसेवकांची गरज आहे. त्यामुळे काहीही होऊ शकते, असे सूचक विधान भाजप नेते तथा नालासोपारा विधानसभेचे आ. राजन नाईक यांनी व्यक्त केले असल्याने चर्चेला उधाण आले आहे. यावेळी वसईच्या आमदार स्नेहा दुबे-पंडित, भाजप नेते नगरसेवक मनोज पाटील, गटनेते अशोक शेळके, जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील, ॲड.दर्शन त्रिपाठी, नारायण मांजरेकर, नवनिर्वाचित नगरसेविका व नगरसेवक उपस्थित होते. काल बैठक झाली, त्यावेळी महापौर पदासाठी ७ व उपमहापौर पदासाठी १० नावे पुढे आली. त्यानंतर बविआ अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांच्यासोबत झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत महापौर व उपमहापौर पदासाठी तीन व दोन नावांची निवड केली. त्यानंतर आज महापालिकेत दोन्ही पदांसाठी नामनिर्देशन पत्र दाखल केली आहेत. पुढील रणनीतीसाठी दोन दिवस बाकी आहेत, थोडं सस्पेन्स राहू द्या. दोन दिवसानंतर सर्वांना समजेलच दोघांपैकी कोणीतरी महापौर व उपमहापौर नक्कीच होणार आहे, असे बविआ नेते माजी महापौर नारायण मानकर यांनी माध्यमांना सांगितले. यावेळी माजी आमदार राजेश पाटील माझी उपमहापौर उमेश नाईक राजीव पाटील प्रफुल साने, प्रशांत राऊत तसेच बविआचे नवनिर्वाचित नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होत्या.

शुक्रवारी बहुजन विकास आघाडी आणि भाजप अशा दोन्ही पक्षाकडून महापौर व उपमहापौर पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. वसई विरार महापालिकेची तिसरी पंचवार्षिक निवडणूक ही अत्यंत ...पान ६ वर

# भुपेश कडुलकर यांचा सहाय्यक पोलीस आयुक्तांकडून ‘प्रशंसापत्र’ देऊन गौरव



**वसई : वार्ताहर**

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजताच्या दरम्यान दिवानमान, वसई पश्चिम येथील पाण्याचे टाकीजवळ वसई विरार शहर महापालिकेचे कर्मचारी तुटलेल्या पाण्याचे पाईप दुरुस्ती करण्याचे काम करीता असताना जलशुध्दीकरणाकरीता ठेवलेल्या क्लोरीन गॅस वायुच्या बाटलीस धक्का लागुन विषारी वायुची गळती होऊन परिसरातील नागरिक या विषारी वायुच्या वासाने बाधीत झाले होते. तसेच त्यामध्ये एकाचा दवाखान्यात दाखल करण्यापुर्वीच मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली होती. सदर घटनेबाबत त्याच परिसरात राहणारे आगरी-कोळी सेनेचे जिल्हाध्यक्ष भुपेश कडुलकर यांनी तत्परतेने पोलीस विभाग व वसई विरार शहर महापालिकेला वेळीच माहिती देऊन ...पान ६ वर

# दलोंडे जिल्हा परिषद शाळेला संगणक व साहित्य भेट



**भिवंडी : वार्ताहर**

विद्युत प्रसारण पायाभूत सुविधा क्षेत्रात कार्यरत रेसोनिया लिमिटेड कंपनी तर्फे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत भिवंडी तालुक्यातील दलोंडे येथील जिल्हापरिषद शाळेस संगणक शैक्षणिक साहित्य भेट देत विद्यार्थ्यांना खाऊ चे वाटप केले आहे. खावडा ४ सी या प्रकल्पाचे विद्युत वहन व टॉवर उभारण्याचे काम ठाणे व पालघर जिल्ह्यात रेसोनिया लिमिटेड कंपनी करीत आहे.त्यांच्या कडून या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक समुदाय विकास आणि शिक्षणाप्रती आपली बांधिलकी पुनः अधोरेखित केली आहे. रेसोनिया लिमिटेड कंपनीचे वरिष्ठ अधिकारी रजनीश पांडे, राजकिशोर, उत्तम शिंदे, अजीत यादव, विजय उईके यांसह स्थानिक विद्यार्थी,शिक्षक तसेच भागीदार संस्थांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी कंपनीतर्फे शाळेच्या पायाभूत सुविधांच्या उन्नतीसाठी संगणक, फळे, कपाटे, पंखे, खुर्च्या व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. खावडा ४ सी पॉवर प्रकल्पा अंतर्गत गुजरातमधील हरित ऊर्जेचे वहन करून ती पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख औद्योगिक केंद्रां पर्यत पोहोचवण्यासाठी विद्युत प्रसारण वाहिन्या उभारल्या जात आहेत. हा प्रकल्प सध्या पालघर जिल्ह्यातील जव्हार, वाडा आण विक्रमगड तालुका तसेच ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्रातील वीजटंचाई कमी होण्यास मदत होईल तसेच राज्याची हरित ऊर्जा उद्दिष्टे वेळेत साध्य करण्यास हातभार लागणार आहे. या कार्यक्रमांतर्गत रेसोनिया ...पान ६ वर

# भिकल्या लाडक्या धिंडा यांना ‘पद्मश्री पुरस्कार’



**पालघर : वार्ताहर**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा झाली आणि पालघर जिल्ह्याच्या जव्हार तालुक्यातील वाळवंडा येथील अतिशय दुर्गम भागात राहणाऱ्या भिकल्या लाडक्या धिंडा यांना ‘पद्मश्री पुरस्कार’ जाहीर झाला. त्यांच्या तारपा वाद्याचे स्वर समाज माध्यमांसह वृत्तवाहिन्यांवर घुमू लागले तेव्हा अनेक श्रोत्यांनी त्यांना ‘शेअर’ चे बटण दाबून दाद दिली. तारपा या आदिवासी वाद्याची परंपराही तितकीच रोचक आहे. आयुष्यभर मेहनत करून निसर्गातच आयुष्य जगलेल्या आणि आता ९२ वय असणाऱ्या भिकल्या धिंडा यांचा ‘पद्मश्री’ ने सन्मान झाला आणि खऱ्या अर्थाने मातीतील कलाकारचा सन्मान झाल्याची भावना व्यक्त होऊ लागली. पालघर हा आदिवासी जिल्हा. जव्हार, मोखाडा, वाडा, पालघर आणि डहाणू हे ...पान ६ वर

# १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड परिक्षेत्र कार्यालय राज्यात प्रथम




**नांदेड : वार्ताहर**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात आलेल्या १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमाच्या मुल्यमापनात नांदेड पोलीस परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यापूर्वी मुख्यमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात देखील नांदेड परिक्षेत्र कार्यालयाने राज्यात द्वितीय क्रमांक प्राप्त केला होता.

याबाबत अधिक माहीती अशी की, दिनांक ७ मे, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सर्व शासकीय कार्यालयांमध्ये कार्यालयीन सुधारणा घडवून आणण्यासाठी १५० दिवसीय ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम राबविण्याचे निर्देश दिले होते. तद्नंतर, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२५ रोजी या कार्यक्रमास दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजी पर्यंत मुदतवाढ दिली होती. सदर कार्यक्रमांतर्गत प्रशासन अधिक लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक व तंत्रज्ञानाधारित व्हावे या उद्देशाने विविध स्तरांवर व्यापक सुधारणा अपेक्षिल्या होत्या. यामध्ये संकेतस्थळ सुधारणा, आपले सरकार पोर्टल, ई-ऑफिस प्रणाली, डेटा डॅशबोर्ड, सोशल मीडिया एकत्रीकरण, व्हॉट्सॲपद्वारे सेवा वितरण तसेच नाविन्यपूर्ण वेब प्लिकेशन या विषयांवर विशेष भर देण्यात आला होता. त्यानुसार, नांदेड पोलीस परिक्षेत्राचे संकेतस्थळ नव्याने बनविण्यात आले असून ते अधिक सुरक्षित व नागरिकाभिमुख करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, संकेतस्थळावर विविध शासकीय योजना व सेवांचे एकत्रीकरणही करण्यात आले आहे. आपले सरकार पोर्टल अंतर्गत तक्रारींचे वेळेत निवारण, ई-ऑफिस प्रणालीद्वारे कागदविरहित व जलद फाईल निपटारा, तसेच इंटरॅक्टिव्ह डेटा डॅशबोर्डद्वारे अचूक व अद्ययावत माहिती सादरीकरण यामुळे प्रशासकीय निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावी झाली आहे....पान ६ वर

